पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १८८ ■ बुधवार, दि. १४ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# आज पतंग तर उद्या लोकशाहीचा उत्सव



प्रतिनिधी १४ जानेवारी

**अकोला :** दोन दिवसांपासून वातारणात एक वेगळेच चैतन्य निर्माण झाले आहे. बालगोपाल व युवकांचा आवडात पतंगोत्सव आज पहाटेपासूनच धूमधडाक्यात सुरू झाला तर उद्या लोकशाहीच्या उत्सवाची तयारी पूर्ण झाली असून, प्रशासन व उमेदवारांसह मतदाराचीही उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. तसेच मनपा निवडणुकीत आचारसंहितेचा भंग कोठेही होऊ नये, म्हणून प्रशासनाने कडक नियमावली केली असून, त्याच्या काटेकोर अंमलबजावणीवर त्यांचा भर राहणार आहे.



जानेवारी उजाडताच बालगोपालांना व युवकांना पतंगोत्सवाचे वेध लागतात. मात्र यंदा नॉयलॉन मांजाबाबत पोलिस प्रशासन ॲक्शन मोडवर असल्याने काहीसा अतिउत्साहीमध्ये निरूत्साह दिसून येत असला तरी पंतग बाजारात आठ दिवसांपासून तुफान गर्दी उसळत आहे. मकरसंक्रातीच्या पूर्वसंध्येला तर तेलीपुरा परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. मकरसंक्रांतला सकाळपासूनच युवक आपल्या घराच्या गच्चीवर, मोकळ्या मैदानात गाण्याच्या तालावर पतंग उडवताना दिसून येत होते. यामध्ये सर्वाधिक संख्या लहान मुलांची असल्याचे दिसून आाले. तसेच काही हौसी नागरिक कुंटुंबासह पतंगोत्सवाचा आनंद लुटताना दिसून आले. त्यांचा आजचा चहा, पाणी व फराळ घराच्या छतावरच झाला. लहान मुलांसोबत वयस्कही पतंग उडवताना दिसून आले होते.

तर दुसरीकडे प्रचाराचा धुराळा थांबल्यानंतर उमेदवार व त्यांचे कार्यकर्ते प्रत्यक्ष गाठीभेटीवर भर देत सकाळपासूनच कामाला लागले होते. आज शेवटचा दिवस असल्याने त्यांच्या पायात दुप्पट बळ आल्यासारखे वाटत होते. आता छुप्या प्रचाराने वेग घेतला आहे. यावेळी ते साम, दाम, दंड आणि भेद या नीतीचाही उपयोग करताना दिसून येत आहे. येनकेनप्रकारे आपल्याला जिंकून यायचेच आहे, असा चंग सर्वच उमेदवारांनी बांधला आहे. आता फक्त आजची रात्र बाकी असल्याने छुप्या प्रचाराने वेग घेतला असून, अनेक घडामोडी घडत आहेत. या सर्वांवर निवडणूक व पोलिस प्रशासन कडक लक्ष ठेवून आहे. कोठेही अनुचित प्रकार आढळून आल्यास पोलिस प्रशासन त्यावर कारवाई करीत आहेत. त्याबरोबर कोठेही आचारसंहितेचा भंग होणार नाही, याकडेही त्यांचे विशेष लक्ष असल्याचे दिसून येते.

## राजकीय पतंगाची डोर मतदार राजाच्या हाती!

महानगरपालिकेची निवडणूक उद्या होणार असल्याने आजची रात्र सर्वांसाठी महत्त्वाची आहे. सध्या सर्वच पक्षांची प्रतिष्ठा पणाला लागली असून, त्यांची धाकधुकही वाढली आहे. कारण या सर्वांची डोर सध्या मतराजाच्या हाती असल्याने ते कोणाची पतंग काटतात आणि कोणाला ढिल देतात, हे मात्र मतदानाच्या निकालानंतरच समजणार आहे. तोपर्यंत उमेदवार त्यांची मनधरणी करण्याची एकही संधी सोडणार नाहीत. त्यामुळे प्रत्येक मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी सर्वच उमेदवार व त्यांच्या पक्षांचे वरिष्ठ मश्गुल असल्याचे दिसून येत आहेत.

# आज कत्ल की रात...!

## गाठीभेटींना वेग, छुप्या बैठकांवर उमेदवार व नेत्यांचा भर

प्रतिनिधी १४ जानेवारी

**अकोला :** महानगरपालिकेची निवडणूक आता शेवटच्या टप्प्यावर आली असून, काल प्रचारतोफाही थांबल्या आहेत. गल्ली बोळातील बॅनर्स, फ्लेक्स, इमारती, पोल, दुकानावर लावलेले स्टिकर्सही काढण्यात आले आहेत.मतदानाचे साहित्य व अधिकारी-कर्मचारी आज संध्याकाळपर्यंत मतदान केंद्रांवर पोहोचणार आहेत. तसेच संवेदनशील व अतिसंवेदनशील केंद्रांचा आढावा घेऊन निवडणूक विभागाने आपली तयारी पूर्ण केली आहे. आज शेवटचा दिवस असल्याने पोलिस विभाग डोळ्यात तेल घालून आहे. शहरात कोणताच अनुचित प्रकार होऊन आचारसंहितेला गालबोट लागणार नाही, याची पुरेपूर दक्षता ते घेत आहेत. तर दुसरीकडे उमेदवार व त्या-त्या पक्षांचे वरिष्ठ नेत्यांसाठी आजची रात्र कत्ल की रात असल्याने छुपा प्रचार, गुप्त बैठका व समीकरणांनीही वेग घेतला आहे. एकप्रकारे शहरात वादळापूर्वीची शांतता पसरल्याचे चित्र दिसून येत आहे.

## अफवा पसरविणाऱ्यांवर होणार कारवाई

जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी वर्षा मिना यांनी मुंबई पोलिस अधिनियम, १९५१ मधील कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश दिला आहे. या नुसार समाजत तेढ निर्माण करणे, भीती किंवा कायदा व सुव्यवस्थेला धोका निर्माण होणारे कृत्य, वक्तव्य किंवा प्रचार करण्यासही मनाई करण्यात आली आहे. तसेच सोशल मीडिया किंवा इतर माध्यमांद्वारे अफवा पसरविणे, चिथावणीखोर मजकूर प्रसारित करणे अथवा लोकांमध्ये गैरसमज निर्माण करणारी माहिती शेअर करण्यावरही प्रतिबंध राहणार आहे.

## नेते, उमेदवार अन् कार्यकर्ते झाले सक्रिय

आज शेवटचा दिवस असल्याने सर्वच अलर्ट मोडवर आले आहेत. यात नेते, उमेदवार व कार्यकर्ते सर्वाधिक सक्रिय असून, छुप्या प्रचारांवर त्यांचा भर आहे. तसेच मतदारांच्या गाठीभेटी घेऊन त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्नही होणार आहे. अनेक उमेदवार व पक्षाचे नेते सामाजिक संस्थ, संघटना यांच्या नेत्याला भेटून काही होते काय, याचीही चाचपणी करीत आहेत. तसेच क्रिकेट संघ, गणेश मंडळे यांनाही हवे नको ते बघत असल्याने प्रचार तोफा थंडावल्या असल्या तरी प्रचाराची चक्रे छुप्या पद्धतीने फिरत असल्याचे दिसून येत आहेत. यात महिला बचत गट, महिला मंडळे यांच्या सदस्यांनाही महिलांच्या माध्यमातून उमेदवार भेट आहेत. हे सर्व होत असले तरी सुज्ञ मतदार राजा प्रत्येकाला हमी देऊन परत पाठवित आहे.

# पोलिस विभाग ॲक्शन मोडवर, निवडणूक विभागाची तयारी पूर्ण

प्रतिनिधी १४ जानेवारी

**अकोला:** उद्या होणाऱ्या महानगरपालिकेच्या मतदानासाठी पोलिस यंत्रणा सज्ज झाली आहे. मतदानाची प्रक्रिया शांततेत पार पडावी, यासाठी १ हजार २२६ जवान तैनात करण्यात आले आहेत. यामध्ये अकोला जिल्हा पोलिस दलाकडून उपविभागीय पोलिस अधिकारी, पोलिस निरीक्षक, सहायक पोलिस निरीक्षक, उपनिरीक्षक, पोलिस कर्मचारी, एसआरपीएफ, होमगार्ड यांचा समावेश आहे. ६३० मतदान केंद्रांपैकी ६४ मतदान केंद्र संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आल्याने या ठिकाणी अतिरिक्त पोलिस बल तैनात करण्यात आले आहे. शहरात २८ सेक्टर तयार करण्यात आले असून, प्रत्येक सेक्टरमध्ये पेट्रोलिंगसाठी एक पोलिस उपनिरीक्षक, दोन पोलिस कर्मचारी व तीन होमगार्डस असा बंदोबस्त राहणार आहे. या शिवाय प्रत्येक पोलिस स्टेशन स्तरावर राखीव बंदोबस्त ठेवण्यात आला.

# मुख्य नेता एकनाथ शिंदेंचे दातृत्व; मधले पाकिटमार कोण ?

प्रतिनिधी १४ जानेवारी

**अकोला:** नगर परिषद व महापालिका निवडणुकीत शिवसेनेच्या प्रचार, प्रचार आणि उमेदवारांसाठी शिवसेना मुख्य नेता एकनाथ शिंदे यांना दातृत्व दाखवित मोठी रसद पुरविली होती. ती रसद मधल्या मध्ये पाकिटमारांनी लंपास केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे ऐनवेळी उमेदवारांना मोठा झटका बसल्याची माहिती आहे. नगर परिषद निवडणुकीत आलेली रसद उमेदवारांपर्यंत पोहचलीच नाही. थेट बोटावर मोजणाऱ्या नेत्यांनीच ती लाटल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. त्यामुळे शिंदे च्या दातृत्वाला नखं लावणाऱ्या पाकिटमारांची लिस्ट शिवसेना पक्ष प्रमुखांपर्यंत पोहचल्याची माहिती असून लवकरच या पाकिटमारांवर कारवाई चे संकेत शिवसेनेतून प्राप्त होत आहे.



रसद पुरविल्याशिवाय राजकारणात यश मिळत नाही. शिवसेनेची मोठी रसद नगर परिषदांच्या निवडणुकीत आली होती. ही रसद योग्य ठिकाणी वापरली गेली असती तर शिवसेनेला मोठे यश जिल्ह्यात प्राप्त झाले असते. पण, ती रसद मध्येच लुटल्याची माहिती आहे. तशीच रसद महापालिका निवडणुकीत आली होती. पण, ती देखील उमेदवारांच्या हातात पोहचली नसल्याची ओरड काहींनी केली तर काहींना ही रसद मिळाल्याची माहिती आहे. त्यासाठी इतर जिल्ह्यातील नेत्यांना कारभार सोपवावा लागला आणि त्यानंतर ही रसद उमेदवारांपर्यंत पोहचल्याची माहिती आहे. जिल्ह्यातील नेत्यांनी आलेल्या रसदवर ताव मारु नये यासाठी इतर जिल्ह्यातील नेत्यांना सजग केले गेले होते. पण, एकूणच शिवसेना मुख्य नेता एकनाथ शिंदे यांच्या पक्षांची मोठी रसद प्राप्त झाल्यानंतर तीचा योग्य विनियोग झाला नाही तर पक्षाला पराभवाचा सामना करावा लागतो. रसद प्राप्तीनंतर ती योग्य ठिकाणी खर्च न होता मध्ये लुटल्या गेल्याच्या बातम्यांनी पक्षातील उमेदवारांना टेन्शन आल्याची माहिती आहे.



सिटी न्यूज अमरावती
बुधवार, दि. १४ जानेवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## अंजनगाव बारीत पाईपलाईन लिकेजचा नागरिकांना फटका; दूषित पाण्यामुळे आरोग्य धोक्यात

**अंजनगाव बारी:** अंजनगाव बारी गावात पाणीपुरवठा पाईपलाईनला अनेक ठिकाणी लिकेज झाल्याने नागरिकांना दूषित पाणीपुरवठा होत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या समस्येबाबत गेल्या अनेक महिन्यांपासून नागरिकांकडून तक्रारी होत असतानाही ग्रामपंचायत प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

पाईपलाईनमधून होणाऱ्या गळतीमुळे सांडपाणी व माती पाण्यात मिसळत असून, हेच पाणी नागरिकांना पिण्यासाठी वापरावे लागत आहे. परिणामी लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. काही नागरिकांनी पोटाचे विकार, ताप व उलट्या-जुलाबाच्या तक्रारी केल्याचेही सांगितले जाते. ग्रामस्थांनी अनेकदा तोंडी तसेच लेखी स्वरूपात तक्रारी करूनही पाईपलाईन दुरुस्ती किंवा नव्याने बदल करण्याकडे प्रशासनाने कानाडोळा केल्याचे चित्र आहे. पाणीपुरवठा विभागाने तातडीने लक्ष घालून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था राखा ; पोलिस आयुक्तांचे आदेश

प्रतिनिधी १४ जानेवारी

**♦ महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक - २०२६ च्या अनुषंगाने पोलीस आयुक्तालयचे आदेश**

**अमरावती:** शहर हद्यीमध्ये एकुण ०७ झोननिहाय २२ प्रभागाचा समावेश येतो. त्यामधे एकुण २३१ ईमारती त्यामधे ८०५ बुथ आहेत. महानगरपालिका अंतर्गत ८७ नगरसेवक निवडीकरीता आयुक्तालय हददीत ६६१ उमेदवार रिंगणात आहेत.

१५.०१.२०२६ रोजी महानगरपालिका मतदान निवडणुक व दि.१६.०१.२०२६ रोजी मतमोजणी व निकाल जाहीर होणार आहे. निवडणुक बंदोबस्ताकरीता अमरावती शहर येथे ०३ पोलीस उपायुक्त, ०७ सहा. पोलीस आयुक्त, ३१ पोलीस निरिक्षक, ९१ सपोनि/पोउपनि १६५० पोलीस अंमलदार, ९०० होमगार्ड व ०१ एसआरपीएफ कंपनी तसेच ०३ आरसीपी पथके व ०४ क्युआरटी पथके असे बंदोबस्ताकरीता नेमण्यात आलेले आहेत. पोलीस आयुक्तालय हददीत ३७ सेक्टर पेटोलींग नेमण्यात आल्या असून त्यांची मतदानांच्या दिवशी सतत पेटोलींग राहणार आहे. तसेच मनपा हददीत २२ प्रभागामध्ये ४४ क्षेत्रीय अधिका-यांसोबत ४४ पोलीस अंमलदार सुध्दा सतत पेटोलींग करणार आहेत. निवडणुक शांततेत पार पाडण्यासाठी व गुन्हेगारांवर निगराणी ठेवण्यासाठी गुन्हे शाखेचे ०८ पथके नेमण्यात आलेली आहे. सायबर पोस्टे च्या माध्यमातुन शहरातील सोशल मिडीयावर घडणा-या घटनांवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येणार आहे. वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे ०८ पेटालींग पथक आरसीपी व क्युआरटी पथका सह नेमण्यात आलेले आहेत. निवडणुक काळात व्यत्यव्य आणणा-या किंवा उपद्रव करणा-या समाजकंटकावर कार्यवाही करण्याकरीता प्रत्येक पोलीस स्टेशनचे ०२ पथके नेमण्यात आलेली आहेत. नियंत्रण कक्ष येथे ०२ पोलीस निरिक्षक दर्जाचे अधिकारी व ०२ पोउपनि नेमण्यात आले असून निवडणुकी दरम्यान घडणा-या घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून वरिष्ठांना माहिती देण्यात येणार आहे. संपूर्ण मतदान व मतमोजणी प्रकीया सिसीटिव्ही निगराणीत पार पडणार आहे. नियंत्रण कक्ष येथे राखीव बंदोबस्ताकरीता ०५ स्टायकिंग फोर्स सर्व साहित्यासह राखीव ठेवण्यात आले आहेत. या व्यतीरीक्त ६९ अंमलदार नियंत्रण कक्ष येथे राखीव ठेवण्यात आले आहे. महानगरपालिका निवडणुक शांततेत पार पडावी करिता आदर्श आचार संहितेच्या कालावधीत पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात एकूण ३५८ शस्त्र परवानाधारक असून ३७२ शस्त्रे आहेत. त्यापैकी २८९ शस्त्रे जमा करण्यात आले तसेच ७८ शस्त्रधारकांना सुट देण्यात आली.

## नवसारी क्रीडा संकुलात १६ टेबलवर मतमोजणी; सकाळी सातपासून प्रक्रिया सुरू

प्रतिनिधी १४ जानेवारी



**अमरावती :** महानगरपालिका निवडणुकीचे मतदान १५ रोजी पार पडले असून, त्याची मतमोजणी मनपाच्या नवसारी क्रीडा संकुलात शुक्रवार, १६ रोजी होणार आहे. यासाठी महापालिका प्रशासनाने पूर्ण तयारी केली असून, एकूण १६ टेबलवर मतमोजणीची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यामध्ये १४ टेबलवर ईव्हीएम मशीनमधील तर २ टेबलवर पोस्टल बॅलेटची मतमोजणी केली जाणार असल्याची माहिती मनपाचे निवडणूक अधिकारी यांनी दिली.

मतमोजणीस सकाळी सुरुवात झाल्यानंतर सातही निवडणूक झोनमधील पहिल्या प्रभागापासून मतमोजणीला प्रारंभ होणार आहे. शहरातील पहिला निवडणूक झोन रामपुरी कॅम्प अंतर्गत येणाऱ्या शेवगाव-रहाटगाव प्रभागातील मतमोजणी सर्वप्रथम सुरू होईल. त्यानंतर दुसरा निवडणूक झोन क्रमांक ३ अंतर्गत येणाऱ्या फ्रेजरपुरा–रुक्मिणी नगर, झोन क्रमांक ४ अंतर्गत येणाऱ्या दस्तूरनगर, झोन क्रमांक ५ अंतर्गत येणाऱ्या जोग स्टेडियम–चपराशिपुरा, झोन क्रमांक ५ मनपा शिक्षण विभाग अंतर्गत येणाऱ्या अंबापेट, झोन क्रमांक ६ अंतर्गत येणाऱ्या विलासनगर–मोरबाग–गवळीपुरा, तसेच झोन क्रमांक ६ जुने तहसील कार्यालय अंतर्गत येणाऱ्या श्याम चौक–जवाहरगेट–बुधवारा प्रभागांची मतमोजणी अनुक्रमे केली जाणार आहे.

त्यानंतर झोन क्रमांक ७ बडनेरा अंतर्गत येणाऱ्या साईनगर–अकोली प्रभागाची मतमोजणी केली जाईल. बडनेरा निवडणूक कार्यालयांतर्गत चार प्रभाग येत असल्याने, येथील मतमोजणी सर्वांत उशिरापर्यंत सुरू राहण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. दरम्यान, नवसारी पोस्टल बॅलेटने मतदान करणाऱ्या निवडणूक कर्तव्यावर नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी टपाल मतदान प्रक्रिया सुरळीत तसेच वेळेत पार पाडण्यासाठी झोन कार्यालय स्तरावर विशेष नियोजन करण्यात आले आहे. या अधिकारी-कर्मचाऱ्यांना मतदानासाठी पी.बी. १ नियम ३ नमुना अर्ज प्राप्त झाले असून, ते अर्ज निवडणूक झोन कार्यालयांना पाठविण्यात आले आहेत. मतदानाच्या दिवशी टपाल मतपत्रिकेवर आपले मत नोंदवल्यानंतर, नियम व वेळापत्रकानुसार ती मतपत्रिका निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे पोहोचविणे बंधनकारक आहे. तसेच मतमोजणी सुरळीत पार पाडण्यासाठी ठरवून दिलेल्या वेळेपूर्वीच टपाल बॅलेट मतमोजणी स्थळी पोहोचवावे लागणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समिती निवडणुकांचे बिगूल वाजले

प्रतिनिधी १४ जानेवारी

**♦ जिल्हा परिषद निवडणुकीचा सविस्तर कार्यक्रम जाहीर**

**अमरावती :** राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समिती निवडणुकांचा अधिकृत कार्यक्रम जाहीर झाला असून, निवडणूक प्रक्रियेला वेग आला आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार उमेदवारी अर्ज भरण्यापासून ते मतमोजणीपर्यंतच्या सर्व महत्त्वाच्या तारखा निश्चित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे संबंधित जिल्ह्यांतील राजकीय वातावरण तापण्यास सुरुवात झाली आहे. या निवडणुकांमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समित्यांवर सत्ता मिळवण्यासाठी सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. इच्छुक उमेदवारांकडून उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी हालचाली वाढल्या असून, स्थानिक पातळीवर प्रचार यंत्रणा सक्रिय होताना दिसत आहेत. आगामी काही दिवसांत राजकीय घडामोडींना वेग येणार असून, ग्रामीण भागातील सत्तेची दिशा ठरवणारी ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

**जिल्हा परिषद निवडणुकीचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे :**

**उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात :** १६ जानेवारी
**अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख :** २१ जानेवारी
**अर्जांची छाननी :** २२ जानेवारी
**अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख :** २७ जानेवारी
**अंतिम उमेदवार यादी व निवडणूक चिन्ह वाटप :** २७ जानेवारी
**मतदान :** ०५ फेब्रुवारी
**मतमोजणी :** ०७ फेब्रुवारी

## अमरावती शहर गुन्हेशाखेकडुन अवैधरित्या मॅथेडॉन (एम.डी.) ची विक्री करणाऱ्या इसमावर धडक कारवाई

प्रतिनिधी १४ जानेवारी



**अमरावती:** पोलीस आयुक्त यांनी अमरावती महानगरपालीका निवडणुकीच्या अनुषंगाने अवैधरित्या अंमली पदार्थ विक्री, करणाऱ्या इसमांवर प्रभावी कार्यवाही करण्याबाबतचे आदेश प्राप्त झालेवरून पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, गुन्हे शाखा अमरावती शहर यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही केली. १३/०१/२०२६ रोजी गुन्हेशाखा चे पथक हे आयुक्तालय हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना पेट्रोलींग दरम्यान गुप्त बातमीदाराकडुन खात्री लायक माहीती मिळाली की, एक इसम हा कोर्टाजवळ असलेल्या पोस्ट ऑफिस येथे आपले जवळ अवैध्यरित्या मैथेडॉन (एम.डी.) नावाचा अंमली पदार्थ बाळगुण विक्री करण्याचे इरादयाने येत आहे. अशा खात्री लायक माहीती वरून पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांचे नेतृत्वात गुन्हे शाखेच्या पथकाने कोर्टाजवळ असलेल्या पोस्ट ऑफिस येथे सापळा रचुन पो. स्टाफ च्या मदतीने नमुद इसम सलमान खॉ आमीर खॉ वय २४ वर्ष रा. इंदीरा नगर, हिवरखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला यास ताब्यात घेतले. त्यांचे ताब्यातुन ४८ ग्रॅम २१० मिली ग्रॅम (एम.डी.) मॅथेडॉन पाउडर किं.अ. ४,४९,२००/- रू चा तसेच गुन्हयात इतर साहीत्य असा एकूण किं.अ. ४,६०,२१० रू चा मुद्देमाल मिळून आल्याने ते जप्त करून सदर एम.डी. मालाबाबत विचारना केली. असता आरोपी यानी फरार इसम मुज्जु, रा. अमरावती यांच्या कडुन घेतल्याचे सांगीतल्याने फरार आरोपी चा शोध घेतला असता मिळुन आला नाही. गुन्हया संदर्भाने फरार आरोपीचा शोध सुरू आहे. वरून नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन गाडगेनगर येथे एन.डी.पी. एस. ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या इसमाचे नावे सलमान खॉ आमीर खॉ वय २४ वर्ष रा. इंदीरा नगर, हिवरखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला असे असून (फरार) मुज्जु, रा. अमरावती आहे. जप्त मुददेमाल ४८ ग्रॅम २१० मिली ग्रॅम (एम.डी.) मॅफेड्रॉन पाउडर किं.अ. ४,४९,२००/- रू,एक विवो कंपनीचा ऑरेंज रंगाचा मोबाईल कि.अं. १०,०००/-रू इलेक्ट्री वनज काटा व स्टिलचा चम्मच किं.अ. १०१०/ असा एकूण ४,६०,२१०/- रूचा मुददेमाल जप्त केला आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त शाम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे रमेश धुमाळ, सपोआ गुन्हे शाखा शिवाजी बचाटे यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनि सपोनि मनिष वाकोडे, पोलीस अंमलदार - सतीश देशमुख, फिरोज खान, अजय मिश्रा, मंगेश लोखंड, सुधीर गुडधे, सैयद नाझीम, अतुल संभे, रंजीत गांवडे, चेतन कराडे, प्रभास पोकळे, चेतन शर्मा यांनी केली.

# महाटीईटी परीक्षेची अंतीम उत्तरसूची जाहीर

प्रतिनिधी १४ जानेवारी

**अमरावती :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत नोव्हेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेची अंतीम उत्तरसूची जाहीर करण्यात आली आहे. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या लेखी निवेदनांवर विषयतज्ज्ञांचे अभिप्राय घेवून अंतिम उत्तरसूची प्रसिध्द करण्यात आली आहे. या अंतिम उत्तरसूची बाबत कोणतेही निवेदन/आक्षेप स्वीकारले जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी, असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेची अंतरिम उत्तरसूची दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. या परीक्षेच्या पेपर क्रं. एक व दोनच्या प्रश्नपत्रिकेतील कोणत्याही प्रश्नाबाबत किंवा पर्यायी उत्तराबाबत त्रूटी आक्षेप असल्यास ते परीक्षा परिषदेकडे दि. २७ डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत पाठविणेबाबत दि. १९ डिसेंबर २०२५ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात आले होते. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या लेखी निवेदनांवर विषयतज्ज्ञांचे अभिप्राय घेवून अंतिम उत्तरसूची प्रसिध्द करण्यात येत आहे. या अंतिम उत्तरसूची बाबत कोणतेही निवेदन/आक्षेप स्वीकारले जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. या अंतिम उत्तरसूचीनूसार MAHATET-2025 परीक्षेचा निकाल यथावकाश परीषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याचीही संबंधित परीक्षार्थींनी नोंद घ्यावी, असेही आवाहन आयुक्त श्रीमती ओक यांनी केले आहे.

## अमरावती जिल्हा प्रशासनाचा संकल्प : 'बालविवाह मुक्त भारत' अभियानांतर्गत ऑनलाइन शपथ घेण्याचे आवाहन

प्रतिनिधी १४ जानेवारी

**अमरावती:** बालविवाहासारखी सामाजिक कुप्रथा मुळापासून नष्ट करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या वतीने 'बालविवाह मुक्त भारत' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा एक भाग म्हणून अमरावती जिल्हा प्रशासनाने 'बालविवाह मुक्त अमरावती जिल्हा अभियान' हाती घेतले असून, याअंतर्गत प्रत्येक नागरिकाने ऑनलाइन शपथ घेऊन आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी केले आहे. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे सहभागी होणाऱ्या नागरिकांना केंद्रीय महिला व बाल विकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांच्या स्वाक्षरीचे प्रशस्तीपत्र मिळणार आहे. ही प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन असून नागरिकांनी खालील पायऱ्यांचे अनुसरण करून आपले प्रमाणपत्र मिळवावे. गुगलवर जाऊन stopchildmarriage.wcd.goved.in या अधिकृत पोर्टलवर जा. 'Login' वर क्लिक करून 'Take Plge' (टेक प्लेज) हा पर्याय निवडावा. आपली वैयक्तिक माहिती भरून सबमिट केल्यावर बालविवाह प्रतिबंधाची प्रतिज्ञा पडद्यावर दिसेल. 'मी प्रतिज्ञा घेतली' या बटणावर क्लिक करताच आपले डिजिटल प्रमाणपत्र डाउनलोडसाठी उपलब्ध होईल. बालविवाहामुळे मुलींचे शिक्षण थांबते आणि त्यांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होतात. समाजातील प्रत्येक घटकाने या अनिष्ट प्रथेविरोधात एकत्र येणे गरजेचे आहे. 'तुमची एक शपथ म्हणजे एका मुलीच्या सुरक्षित भविष्यासाठी उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे,' अशा शब्दांत प्रशासनाने या मोहिमेचे महत्त्व अधोरेखित केले आहे. जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या वतीने या मोहिमेचा प्रचार ग्रामीण भागापर्यंत केला जात असून, अमरावती जिल्ह्याला बालविवाह मुक्त करण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने या ऑनलाइन शपथ अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक मतमोजणी असल्यामुळे १५ व १६ जानेवारीला वाहतुकीमध्ये अंशत: बदल

प्रतिनिधी १४ जानेवारी

**अमरावती :** महानगरपालिका अमरावती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ मतमोजणी दि. १६ जानेवारी २०२६ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख, क्रीडा व वाणिज्य संकुल, महानगरपालिका, नवसारी, अमरावती येथे सकाळी १० वाजेपासून सुरू होणार आहे. तत्पुर्वी दि. १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान प्रक्रिया आटोपल्यानंतर मतदान केंद्रावरील इव्हीम मशीन, कंट्रोल युनीट इत्यादी सामुग्री घेवून येणाऱ्या वाहनांची वर्दळ मतमोजणी केंद्र परिसरात मोठ्या प्रमाणात राहणार आहे. तसेच दि. १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी प्रक्रियेसाठी सकाळी ८ वाजेपासून संबंधित अधिकारी, उमेदवार, मतमोजणी प्रतिनिधी महानगरपालिका क्रीडा संकुल, नवसारी, अमरावती परिसरात मतमोजणीसाठी दाखल होतील.

मतमोजणी प्रक्रीयेसाठी मोठ्या संख्येने येणार शासकीय व खाजगी नागरिक यांची व वाहनांची वर्दळ लक्षात घेता मतदान केंद्र परिसरात वाहतुक कोंडी, अपघात यासारखा प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो. सर्व सामान्य नागरिकांचे जीवित रक्षण व कायदा व सुव्यवस्था हाताळण्यासाठी मतमोजणी केंद्र परिसरासमोरील मार्गावरील वाहतुक बंद करून इतर मार्गाने वळविण्यात येणार आहे. पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ यांनी मुंबई पोलीस कायदा तसेच मोटर वाहन कायदा अन्वये हा आदेश जारी केला आहे. प्रवेश बंदी मार्ग- कठोरा ते छत्रपती संभाजी राजे चौक राजपूत धाबा चौक पर्यंत. कालावधी- गुरूवार दि. १५ जानेवारी २०२६ चे रात्री १० वाजेपासून शुक्रवार दि. १६ जानेवारी २०२६ चे संपूर्ण मतमोजणी प्रक्रीया संपेपर्यंत राहील. याला पर्यायी मार्ग- पंचवटीकडून नवसारीकडे जाणाऱ्या सर्व वाहनांनी कठोरा नाका रंगोली लॉन-कठोरा जकात नाका या पर्यायी मार्गाचा वापर करावा. राजपूत धाबाकडून पंचवटीकडे येणाऱ्या सर्व वाहनांनी पर्यायी मार्ग-राजपूत धाबा-रिंगरोड-पोटेपाटील चौक-कठोरा नाका फक्त किंवा राजपूत धाबा-रिंगरोड-पोटे पाटील चौक-रहाटगाव टी पॉईटं या मार्गाचा अवलंब करावा.

## श्री. शिवाजी शिक्षण महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची राज्य पुरस्कार प्राप्त प्रथम शाळा प्रभात किड्स स्कूलला शैक्षणिक भेट व शैक्षणिक सामंजस्य करार

प्रतिनिधी १४ जानेवारी



**अमरावती :** १२ जानेवारी रोजी श्री. शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती येथील बी.एड. प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रभात किड्स स्कूल (CBSE) येथे शैक्षणिक भेट दिली. 'माझी शाळा, सुंदर शाळा' या राज्यस्तरीय उपक्रमात राज्यातून प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या या आदर्श शाळेतील नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यासाठी ही भेट आयोजित करण्यात आली होती.

सकाळी ११.३० वाजता शैक्षणिक चमू प्रभात किड्स स्कूलमध्ये दाखल झाला. या भेटीसाठी श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनय एम. राऊत यांच्या नेतृत्वाखाली व या भेटीच्या समन्वयक प्रा. डॉ. अंजली ठाकरे , डॉ. किशोर क्षत्रिय यांच्या मार्गदर्शन मधे शैक्षणिक भेटी चे आयोजन करण्यात आले.

प्रशस्त, स्वच्छ व अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेला प्रभात किड्स स्कूलचा परिसर ने सर्वांचे लक्ष वेधून घेत शाळेकडे स्वतःच्या अनेक बसेस, बहुउद्देशीय हॉल, सुस्थितीत ठेवलेले मैदान तसेच अग्निशामक यंत्रणा व आपत्कालीन बाहेर पडण्याची अचूक व्यवस्था आहे. चार मजली इमारत, सुंदर बागा आणि सुरक्षित शैक्षणिक वातावरण ही शाळेची वैशिष्ट्ये आहेत. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना शाळेतील विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती देण्यात आली. विज्ञानाची भिंत या उपक्रमातून वैज्ञानिक संकल्पना स्पष्ट करून अंधश्रद्धा व मिथकांचे खंडन केले जाते. भारतातील भविष्यातील शेतकरी या उपक्रमाद्वारे शेतीविषयक ज्ञान दिले जाते. आत्मविश्वास वृद्धिंगत करण्यासाठी नुक्कड मंच, भाषा विकासासाठी भाषा कट्टा, तर सर्जनशीलतेसाठी हॅपी स्ट्रीट हे उपक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत.

## मार्डी- अमरावती मार्गावर ट्रकच्या धडकेत विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू

प्रतिनिधी १४ जानेवारी



**अमरावती:** मार्डी ते अमरावती या मुख्य मार्गावरील तपोवन परिसरात झालेल्या भीषण अपघातात एका विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. भरधाव ट्रकने दिलेल्या धडकेत हा अपघात घडल्याची प्राथमिक माहिती आहे.

मृत विद्यार्थी हा शिक्षणासाठी अमरावतीकडे जात असल्याचे सांगण्यात येत असून अपघात इतका भीषण होता की घटनास्थळीच त्याचा मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. यानंतर पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली.

पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. संबंधित ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून अपघाताचे नेमके कारण तपासाअंती स्पष्ट होणार आहे.

या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे मार्डी–अमरावती मार्गावरील वाहतूक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.



३ सिटी न्यूज अकोला
बुधवार, दि. १४ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# कापूस उत्पादक शेतकऱ्यांना सेंट्रल बँकेचे आवाहन

**अडगांव बु. :** येथील सेंट्रल बँक ऑफ इंडिया च्या शाखेमार्फत कापूस उत्पादक शेतकऱ्यांना एक महत्त्वाची सूचना जारी करण्यात आली आहे. भारतीय कापूस निगम कडे आपला कापूस विक्री करताना शेतकऱ्यांनी आपला आधार क्रमांक कोणत्या बँक खात्याची लिंक आहे याची खात्री करूनच खाते क्रमांक द्यावा असे आवाहन शाखा व्यवस्थापक मेश्राम यांनी केले आहे. सध्या शेतकऱ्यांच्या कापसाची सीसीआयकडून मोठ्या प्रमाणात खरेदी केली जात आहे. कापूस खरेदीचे पैसे थेट शेतकऱ्यांच्या आधार लिंक असलेल्या खात्यात जमा केले जातात अनेक शेतकऱ्यांचे आधार कार्ड त्यांच्या पीक कर्ज खात्याची सलग्न असते जर सीसीआयचे पैसे या कर्ज खात्यात जमा झाले तर ते तातडीने काढताना शेतकऱ्यांना तांत्रिक अडचणीचा सामना करावा लागतो. ही प्रक्रिया अत्यंत क्लिष्ट आणि वेळ खाऊ असल्याने ऐन गरजेच्या वेळी शेतकरी अडचणीत येऊ शकतात.

# भाजपचे प्रथमेश बोरोडे अकोट नगरपालिकेच्या उपाध्यक्षपदी अविरोध

## ◆ एमआयएमच्या भूमिकेमुळे 'छुप्या युती'ची राजकीय चर्चा

प्रतिनिधी १४ जानेवारी



**अकोट:** नगरपालिकेच्या उपाध्यक्षपदाची निवडणूक प्रक्रिया मंगळवारी पूर्ण झाली असून भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक प्रथमेश संजय बोरोडे यांची अविरोध निवड झाली आहे. भाजपचे बोरोडे यांना अकोट विकास मंचचा पाठिंबा मिळाल्याने उपाध्यक्षपदावर त्यांची निवड झाली.

उपाध्यक्षपदासाठी भाजपकडून प्रथमेश संजय बोरोडे तर काँग्रेसकडून रेणुका पांडुरंग खवले यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र, खवले यांनी ऐनवेळी उमेदवारी मागे घेतल्याने बोरोडे यांची अविरोध निवड जाहीर करण्यात आली.

दरम्यान, नगरपालिकेतील स्वीकृत सदस्यांच्या नियुक्त्याही जाहीर करण्यात आल्या. अकोट विकास मंचतर्फे मंगेश लोणकर व संतोष झुनझुनवाला यांची स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. तर काँग्रेसतर्फे सारंग मालाणी यांची स्वीकृत सदस्यपदी निवड झाली. एमआयएम पक्षातर्फे जितेश रामचंद्र बरेठिया यांची स्वीकृत सदस्य म्हणून निवड करण्यात आली. विशेष म्हणजे जितेश बरेठिया हे रामचंद्र बरेठिया यांचे पुत्र असून एमआयएमकडून निवडून आलेल्या पाचही नगरसेवकांनी त्यांना मत देत स्वीकृत सदस्य म्हणून निवडून दिले. रामचंद्र बरेठिया यांनी काही दिवसांपूर्वी काँग्रेसमधून भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यामुळे भाजप नेत्याच्या मुलाला एमआयएमने पाठिंबा दिल्याने भाजप-एमआयएम छुपी युती अस्तित्वात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. नगरपालिकेतील घडामोडींमुळे अकोटच्या राजकीय समीकरणांकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले गेले आहे. आगामी काळात नगरपालिकेचा कारभार व विकासकामां बाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

# नप उपाध्यक्षपदी सैय्यद अबरार सै. मीर



**बार्शीटाकळी:** १३ जानेवारी रोजी उपनगराध्यक्ष पदाकरिता वंचित बहुजन आघाडीचे सैय्यद अबरार सैय्यद मीर हे निवडून आले. सैय्यद अब्रार सय्यद मीर यांनी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर व सुजात आंबेडकर यांना निवडीचे श्रेय दिले. आहे व यांचे सहयोगी नाम भाई सय्यद अन्सार सुनील शिरसाठ, पठाण, इम्रान खान आदी उपस्थित होते.

# नप उपाध्यक्षपदी सुरेंद्र धोपटे

प्रतिनिधी १४ जानेवारी



**बाळापुर:** नगर परिषदेच्या उपाध्यक्षपदी महाविकास आघाडीचे सुरेंद्र मधुकरराव धोपटे यांची निवड झाली. त्यांना १४ मते मिळाली. त्यांनी सय्यदैनदिन खतीब यांचा पराभव केला. सैयदोद्दिन खततीब यांना १० मते मिळाली तर भारतीय जनता पार्टीचे सदस्य गुजराती, अपक्ष सज्जाद हे तटस्थ राहिले.

# नप उपाध्यक्षपदी भाजपचे सचिन तायडे

प्रतिनिधी १४ जानेवारी



**तेल्हारा:** नगरपरिषद उपाध्यक्षपदी भारतीय जनता पक्षाचे सचिन तायडे यांची निवड झाली. तसेच गजानन गायकवाड व मोनिकाताई वाघ यांची स्वीकृत सदस्यपदी निवड करण्यात आली. मंगळवारी दुपारी ही प्रक्रिया पार पडली.

# हिवरखेड नप उपाध्यक्षपदी प्रतिभा येऊल



**हिवरखेड:** नप उपाध्यक्षपदी प्रतिभताई विरेंद्र येऊल यांची निवड झाली. स्विकृत नगरसेवक पदी किरण सेदाणी यांची भारतीय जनता पक्ष तर शिवसेना शिंदे गटाकडून श्यामशील भोपळे यांना घेतले. १३ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता नगरपरिषद येथुन रॅली काढण्यात आली. विजय साजरा केला.

# सागवानची विनापरवाना वाहतूक करणाऱ्यास अटक

प्रतिनिधी १४ जानेवारी



**कुटासा:** अकोला वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) विश्वास थोरात यांच्या पथकाने सोमवारी अकोट तालुक्यात सागवानाच्या अवैध वाहतुकीविरोधात मोठी कारवाई केली.या कारवाईत अवैध सागवान लाकूड वाहतूक करणारा आरोपी शेख साजीद शेख आतीफ वय २४ वर्ष रा.केळीवेळी याला दुचाकीसह ताब्यात घेण्यात आले आहे.सागवान अवैध वाहतुकीबाबत मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार अकोट तालुक्यातील मौजा हिंगणी परिसरात सापळा रचण्यात आला होता.दरम्यान सागवान प्रजातीच्या अवैध लाकडाची वाहतूक करणारे एक संशयास्पद वाहन दिसून आले.वन पथकाने वाहन थांबविण्याचा प्रयत्न केला असता,चालक शेख साजीद शेख आतीफ याने पळ काढला.मात्र दहीहंडा गेट परिसरात पाठलाग करून वाहनासह आरोपीस ताब्यात घेत वनपरिक्षेत्र अधिक थोरात यांना मिळालेल गुप्त माहितीनुसार दहीहांडा रोड परिसर नाकाबंदी करण्यात आली होती.यावेळी एमएच ३०-५४५३ क्रमांकाच्या दुचाकी थांबविण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने घटनास्थळावरून पळून जाण्याचा प्रयत्न केला.पाठलाग करत त्याला पकडले.वाहनाची तपासणी केली असता मोठ्या प्रमाणात सागवान आढळून आले. संपूर्ण सागवान माल वन विभागाने जप्त केला आहे. तन पथकाने त्याचा १४ हजार रुपयांचे सागवान जप्त करण्यात आले.आरोपीकडे सागवान लाकडाच्या वाहतुकीसाठी कोणताही वैध परवाना अथवा वन विभागाचे अधिकृत दस्तऐवज आढळून आले नाहीत.याप्रकरणी वन अधिनियमांच्या विविध कलमान्वये वन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चोहोट्टा बाजार येथे अवैध मातीची वाहतूक करणारे टिपर जप्त

## ◆ महसूल विभागाची कारवाई

प्रतिनिधी १४ जानेवारी



**कुटासा:** महसूल प्रशासनाने अवैध माती वाहतुकीवर लगाम लावण्यासाठी आज सकाळी चोहोट्टा बाजार येथे मातीची अवैध वाहतूक करणाऱ्या टिप्परवर कारवाई केली. उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर व तहसीलदार सुनील चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली, नायब तहसीलदार नरेंद्र सोनवणे यांच्या नेतृत्वात ही कारवाई पार पडली.गुप्त माहितीच्या आधारे, Mhed 30 BD 6241 क्रमांकाचा टिपर थांबवून तपासणी करण्यात आली. सदर वाहन माती भरून नेत असताना कोणतीही वैध परवानगी नसल्याचे आढळून आले. वाहन चालवणारा अशोक सोनाजी ओइंबे याच्याविरुद्ध संबंधित कायद्यांतर्गत कारवाई सुरू करण्यात आली आहे. घटनास्थळी पंचनामा करून टिपर जप्त करण्यात आला असून, महाराष्ट्र जमाबंदी अधिनियम १९६६ व पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अंतर्गत पुढील कार्यवाही सुरू आहे.

या कारवाईत तलाठी एस. एन. दाभाडे व कोतवाल चेतन वडाळ यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या तत्परतेमुळे ही कारवाई यशस्वीपणे पार पडली. संध्याकाळपर्यंत संबंधित पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती, अशी माहिती महसूल प्रशासनाकडून देण्यात आली.नायब तहसीलदार सोनवणे यांनी सांगितले की, ठअवैध उत्खनन व वाहतूक ही पर्यावरण व शेतकऱ्यांच्या हितासाठी घातक असून, अशा प्रकारांवर कठोर कारवाई सुरूच राहील.

# श्री गजानन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात जिजाऊ जयंती साजरी

प्रतिनिधी १४ जानेवारी



**अकोट:** अकोली जहागीर येथे श्री गजानन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रमाता जिजाऊ तसेच स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी झाली. कार्यक्रमाची सुरुवात कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमापूजनाने करण्यात आली .कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.अशोक खंडारे तर प्रमुख अतिथी ज्येष्ठ शिक्षक विलास उमक, विक्रम सावरकर विलास वानखडे, किशोर जालंदर हे होते.

प्रा.अशोक खंडारे यांनी राष्ट्रमाता जिजाऊंच्या अलोकिक जीवन व कार्यावर प्रकाश टाकला. स्वराज्याची प्रेरणा तसेच स्वराज्याच्या सारथी म्हणून त्यांनी कशी भूमिका पार पाडली हे सविस्तर सांगितले. स्वराज्याच्या दोन छत्रपतींना घडविणारे त्यांचे लोकोत्तर कार्य पिढ्यानपिढ्या आपणास प्रेरणा देत राहील. स्वराज्याचे स्वप्न पाहून ते पूर्णत्वास नेणाऱ्या जिजाऊ खरोखर महान आहेत असे प्रतिपादन केले. याप्रसंगी बरेच विद्यार्थी तसेच शिक्षकांनी जिजाऊ तसेच विवेकानंदांच्या बद्दल आपले विचार व्यक्त केले. सावरकर सर व बागडी सरांनी कार्यक्रमासाठी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे संचालन गजानन तलवारे सर यांनी केले, विद्यार्थ्यांना चॉकलेट वाटून कार्यक्रमाची सांगता झाली.

# हिदायत पटेल यांना सर्वपक्षीय भावपूर्ण श्रद्धांजली

वि. प्रतिनिधी १४ जानेवारी

**अकोट:** तालुका सहकार परिवाराचे प्रमुख मार्गदर्शक, ज्येष्ठ सहकार नेते तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष स्व. हिदायतजी पटेल यांना अकोट येथे सर्वपक्षीय श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. अकोला जिल्ह्यातील अकोट शहरातील झुंनझुनवाला सभागृहात आयोजित हा श्रद्धांजली कार्यक्रम अत्यंत भावपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहकार परिवाराचे अध्यक्ष नानासाहेब हिंगणकर होते. यावेळी माजी आमदार संजय गावंडे, ललितदादा बहाळे, अशोकराव अमानकर, महेश गणगणे, प्रशांत पाचडे, प्रभाकरराव मानकर, शिवाजीराव देशमुख, डॉ. प्रमोद चोरे, दिलीप बोचे, डॉ. विशाल इंगोले, प्रदीप वानखडे, अतुल खोटरे, उमेश पवार, कैलास गोंडचोर, श्रेयश चौधरी, सचिन शिंदे, डॉ. अनिल गणगणे, गोपाल कोल्हे, रामबिलास अग्रवाल, पवन शर्मा, अविनाश डिक्कर, रामदास थारकर, दयाराम धुमाळे, शंकरराव लोखंडे, हेमंत देशमुख, बाळासाहेब बोंद्रे, प्रभाकर नगराळे, सारंग मालानी, अनोख राहणे, मुकुंद पांडे यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

सर्व मान्यवरांनी आपल्या भाषणांतून स्व. हिदायत पटेल यांच्या सामाजिक, राजकीय आणि सहकार क्षेत्रातील भरीव योगदानावर प्रकाश टाकत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. अध्यक्षीय भाषणात नानासाहेब हिंगणकर यांनी स्व. पटेल हे सर्वसामान्यांशी नाळ जुळवून काम करणारे नेतृत्व होते, असे सांगून त्यांच्या कार्याचा गौरव केला.

कार्यक्रमास पटेल कुटुंबीय, त्यांचे पुत्र व बंधू प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कपिल ढोके यांनी केले, तर सूत्रसंचालन राजू नागमते यांनी अत्यंत संयत आणि प्रभावी पद्धतीने पार पाडले. हा श्रद्धांजली कार्यक्रम सर्व राजकीय पक्ष, हिदायत पटेल मित्र परिवार आणि अकोट तालुका सहकार परिवार यांच्या संयुक्त वतीने आयोजित करण्यात आला होता. तालुक्यातील सहकारप्रेमी नागरिक, विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी तसेच सर्व समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्व. हिदायत पटेल यांना प्रतिनिधिक स्वरूपात भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# निधन वार्ता

### मंजुराबाई गोतरकार



**हिवरखेड:** येथील कपिल गोतरकार यांची आजी मंजुराबाई लालाजी गोतरकार ८८,यांचे १३ जानेवारीला रात्री निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्त परिवार आहे.

### रईसा खलील सौदागर



**अकोट:** अकोलखेडच्या माजी ग्राम पंचायत सदस्य रईसा खलील सौदागर (४५) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या मागे पती, दोन मुले, एक मुलगी व मोठा आप्त परिवार आहे.

# आलेगाव डोणगाव रस्त्यावरील खड्डे थातूरमातूर भरले

## ◆ बिले काढण्यासाठी खड्डे भरण्याचे काम केले प्रवाशांचा आरोप

प्रतिनिधी १४ जानेवारी



**आलेगाव:** यावर्षीच्या अतिवृष्टीमुळे,आलेगाव डोणगाव अतिरहदारी असलेल्या रस्त्यावर जीवघेणे पडले होते.त्या रस्त्यावरील खड्डे संबंधित प्रशासनाने नुकतेच खड्डे भरण्याचे काम केले. परंतु सदर खड्डे हे निकृष्ठ पद्धतीने भरून बिले काढण्यासाठी काम केल्याचा आरोप प्रवाशांकडून होत आहे.

पातूर तालुक्यातील आलेगाव परिसरामध्ये या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे आलेगाव डोणगाव वाहतूक रस्ता असून सदर रस्त्यावरून मेहकर तालुक्यातील अनेक गावातील प्रवासी आणि वाहनांची मोठी रेलचेल असते. तसेच मळसूर, राजगड, पांगरखेड, उंबरवाडी, झरंडी, वसाली आदि खेडे गावांचे प्रवासी दळणवळण करीत असतात.तसेच रुग्णवाहिका नियमित रुग्ण घेऊन अकोला कडे फेऱ्या मारीत असते. आणि हा अतिरहदारीचा रस्ता पार उखडून गेल्याने सदर रस्त्यावर मोठ मोठे जीवघेणे खड्डे पडले, त्यामुळे वाहन चालक प्रवाशांना जिवमुठीत घेऊन प्रवास करण्याची वेळ आली.या बाबत विविध वृत्तपत्रातून संबंधित प्रशासनाला कळविले होते.त्या नुसार संबंधित प्रशासनाने गत महिन्यामध्ये सदर रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे अर्थात पॅचेस भरण्याचे काम ठेकेदार कडून करवून घेतले.परंतु संबंधित ठेकेदाराने, अनेक खड्डे न भरता सोडून दिल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.आणि जे खड्डे भरण्यात आले त्यामध्ये बऱ्याच ठिकाणी फक्त मुरूम तर काही खड्डयांमध्ये चक्क माती टाकुण फक्त बिले काढण्यासाठी थातूरमातूर खड्डे भरल्याचा आरोप वाहन चालक आणि प्रवाशांकडून होत आहे.


# जळगाव नहाटेला राजमाता जिजाऊ जयंती साजरी



प्रतिनिधी १४ जानेवारी

**अकोट:** जळगाव नहाटे येथील तरुण, ग्रामपंचायत व सम्यकदृष्टी बहुउद्देशीय सेवाभावी शिक्षण संस्थेतर्फे राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचे गावकऱ्यांच्या पूजन व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच शरद नहाटे, अध्यक्ष निखिल वानखडे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी त्यांच्या जीवन प्रणालीवर प्रकाश टाकण्यात आला, जयंती उत्सवा करता गावातील सम्यक दृष्टी बहुउद्देशीय सेवाभावी शिक्षण संस्था सर्व पदाधिकारी निलेश नहाटे, नितीन हिंगणकर ,वासुदेव नहाटे, सुनील वानखडे, रमेश नहाटे , बापूराव नहाटे ,रिंकच वाकोडे, यांनी सर्वांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावून जयंती साजरी करण्यात आली जयंती उत्सव कार्यक्रमाचे आयोजन निखिल वानखडे यांनी केले होते यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. १४ जानेवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## डाक जीवन विमा योजनेसाठी अभिकर्त्यांची थेट भरती

प्रतिनिधी १४ जानेवारी

**यवतमाळ** : भारतीय डाक विभागाच्या यवतमाळ विभागाअंतर्गत डाक जीवन विमा योजनेसाठी अभिकर्त्यांची थेट नेमणूक करण्यात येणार आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांची निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे केली जाणार असून मुलाखतीचे आयोजन दि. २३ जानेवारी रोजी सकाळी ११ ते ३ या वेळेत अधीक्षक डाकघर, यवतमाळ कार्यालयात करण्यात आले आहे. उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे व शैक्षणिक पात्रता १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. निवड मुलाखतीतील कामगिरी, संवाद कौशल्य व व्यक्तिमत्वावर आधारित राहणार आहे. बेरोजगार युवक, महिला, माजी सैनिक व स्वयंरोजगारातील उमेदवारांना प्राधान्य दिले जाणार आहे.

## भरधाव वाहनाच्या धडकेत इसमाचा मृत्यू

प्रतिनिधी १४ जानेवारी

**वणी** : वणी–मारेगाव मार्गावरील लालपुलिया परिसरातील अमित ढाब्यासमोर १२ जानेवारी रोजी रात्री १०.१५ वाजताच्या सुमारास भरधाव वाहनाच्या धडकेत इसमाचा दुर्दैवी मृत्यू झाला. चेंडकू रामभाऊ आत्राम (वय ५२, रा. पळसोनी ता. वणी) असे मृताचे नाव आहे.

पळसोनी येथील रहिवासी असलेले चेंडकू आत्राम हे जेवणासाठी लालपुलिया परिसरातील अमित ढाब्याकडे जात होते. केरला टायर्स दुकानाजवळ त्यांनी दुचाकी उभी करून पायदळ रस्ता ओलांडत असताना मारेगावकडून भरधाव येणाऱ्या बुलेरो पिकअपसदृश वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात आत्राम गंभीर जखमी झाले. अपघातानंतर वाहनचालक घटनास्थळावरून वाहनासह पसार झाला. नागरिकांनी तत्काळ जखमी अवस्थेतील आत्राम यांना ग्रामीण रुग्णालयात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले.

मृतकाचा मुलगा वैभव चेंडकू आत्राम (वय २२) यांनी वाहनचालकाच्या निष्काळजी व भरधाव वाहनचालना विरोधात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार पोलिसांनी बीएनएस कलम २८१ व १०६(१) अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# शेतीच्या वादातून शेतकऱ्याची हत्या

प्रतिनिधी १४ जानेवारी



**यवतमाळ** : शेतीच्या मालकी हक्काच्या जुन्या वादातून यवतमाळ जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील बेलोरी (पोड) येथे एका शेतकऱ्याची दगडाने ठेचून निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

श्रीराम लक्ष्मण सुरपाम (वय ४५) असे मृत शेतकऱ्याचे नाव असून या प्रकरणी संभा धर्माजी गाडेकर (वय ४८, रा. बेलोरी) याला अटक करण्यात आली आहे.

वडगाव (जंगल) पोलीस स्टेशनच्या हद्दीत ही घटना घडली. मृताच्या पत्नी वनिता सुरपाम यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, श्रीराम सुरपाम यांच्या नावावर बेलोरी शिवारात तीन एकर शेती असून उमरपोड शिवारातील वडिलोपार्जित शेतीवरून आरोपी संभा गाडेकर याच्याशी दीर्घकाळापासून वाद सुरू होता. संबंधित शेती आपल्या नावावर करण्यासाठी आरोपी सातत्याने दबाव टाकत होता. काही दिवसांपूर्वी याच कारणावरून आरोपीने श्रीराम यांना धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. १२ जानेवारी रोजी श्रीराम सुरपाम हे गणेशपूर येथे नातेवाईकांकडे गेले होते. त्याच दिवशी सायंकाळी आरोपी संभा गाडेकर हा त्यांच्या घरी येऊन श्रीराम कुठे आहेत, अशी चौकशी करून रागाच्या भरात निघून गेल्याचे पत्नीने सांगितले. दुसऱ्या दिवशी, १३ जानेवारी रोजी सकाळी पुतण्या विनोद सुरपाम याने श्रीराम यांची हत्या झाल्याची माहिती दिली. कापसाच्या शेतातील तुरीच्या ओळीत श्रीराम सुरपाम यांचे प्रेत आढळून आले. डोक्यावर, तोंडावर आणि शरीरावर दगडाने मारहाण केल्याच्या गंभीर जखमा दिसून आल्या असून प्रेत ओढत आणल्याच्या खुणाही घटनास्थळी आढळल्या.

या प्रकरणी वनिता सुरपाम यांच्या जबानी तक्रारीवरून वडगाव (जंगल) पोलीस स्टेशनमध्ये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपीला अटक करण्यात आली असून पुढील तपास ठाणेदार विकास दांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक उपनिरीक्षक बोकडे व बिट जमादार धनंजय शेखदार करीत आहेत.

शेतीच्या कागदोपत्री वादातून थेट खुनापर्यंत गेलेली ही घटना परिसरात खळबळ उडवून देणारी ठरली आहे.

# दुचाकी–ऑटोची धडक; दुचाकीस्वार जागीच ठार

प्रतिनिधी १४ जानेवारी



**फुलसावंगी** : येथील किनवट रोडवर शिवरामजी मोघे महाविद्यालयाजवळ दुचाकी व मालवाहक ऑटोची समोरासमोर जोरदार धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. ही घटना काल दुपारच्या सुमारास घडली.

पंडित दत्ता चव्हाण (वय ३२), रा. कुरळी असे मृतकाचे नाव आहे. पंडित चव्हाण हे फुलसावंगी येथून कुरळीच्या दिशेने दुचाकी क्रमांक एमएच २९ सीएन ६८७२ वरून जात होते. याच वेळी विरुद्ध दिशेने येणारा मालवाहक ऑटो (एमएच २९ बीडी ३७५८) यांच्यात मोघे महाविद्यालयाजवळ समोरासमोर भीषण धडक झाली. या अपघातात पंडित चव्हाण यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर अपघातात दोन शाळकरी मुले जखमी झाली असून ऑटोचालकालाही दुखापत झाली आहे. जखमींना प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी पुसद येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळताच फुलसावंगी येथील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना तातडीने उपचारासाठी हलविले.

घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक अमोल राठोड यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक धनराज निळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक अमोल राठोड करीत आहेत. अपघातामुळे काही काळ किनवट रोडवरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

# यवतमाळ पोलीस दलात फेरबदल; ६ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

प्रतिनिधी १४ जानेवारी

**यवतमाळ** : यवतमाळ जिल्हा पोलीस दलात प्रशासकीय कारणास्तव महत्त्वाचे फेरबदल करण्यात आले आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी दिलेल्या आदेशानुसार ६ पोलीस अधिकारी व सहाय्यक पोलीस निरीक्षकांच्या तात्पुरत्या बदल्या व नेमणुका जाहीर करण्यात आल्या आहेत.

या आदेशानुसार बाभुळगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार पोनि. लहु देविदास तावरे यांची पांढरकवडा पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. महिला सेल व गुन्हे देखरेख कक्षातील पोनि. दिपमाला सुरेशराव भेंडे यांची बाभुळगाव पोलीस ठाण्याच्या ठाणेदारपदी नेमणूक करण्यात आली आहे.

पांढरकवडा पोलीस ठाण्याचे ठाणेदार पोनि. दिनेश विठ्ठलराव झांबरे यांची सीसीटीएनएस कक्ष, डायल-११२, गुन्हे देखरेख कक्ष तसेच आर्थिक गुन्हे शाखेत बदली करण्यात आली आहे. यवतमाळ शहर पोलीस ठाण्यातील सपोनि. मिलींद हरिचंद्र सरकटे यांची पाटण पोलीस ठाण्याच्या ठाणेदारपदी नियुक्ती करण्यात आली असून, पाटण येथील सपोनि. स्वप्निल रविंद्र ठाकरे यांची यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. सायबर सेलचे प्रभारी अधिकारी पोनि. यशोधरा दिगंबर मुनेश्वर यांच्याकडे महिला सेल व भरोसा सेलचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.

बदली झालेल्या सर्व अधिकाऱ्यांनी तात्काळ नव्या नेमणुकीच्या ठिकाणी हजर होऊन अनुपालन अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या बदल्यांमुळे जिल्ह्यातील पोलीस प्रशासन अधिक गतिमान होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## दिव्यांग अधिकाऱ्याला मागितली खंडणी

प्रतिनिधी १४ जानेवारी

**उमरखेड** : येथील तहसील कार्यालयात सहायक महसूल अधिकारी पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यास दिव्यांग प्रमाणपत्र काढून देतो असे सांगून १ लाख ३० हजार रुपयांची मागणी करत, पैसे न दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी उमरखेड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. ही तक्रार सहायक महसूल अधिकारी निरंजन धनसिंग पवार (वय ४१) यांनी मंगळवार, १३ जानेवारी रोजी दिली.

तक्रारकर्ते पवार हे दिव्यांग असून शासकीय नियमानुसार प्रमाणपत्रासाठी यवतमाळ येथे गेले असता सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुसद तालुक्यातील जांब बाजार येथील अमजत पठाण नावाच्या व्यक्तीने डॉक्टर ओळखीचे असल्याचे सांगत प्रमाणपत्र तात्काळ काढून देण्याचे आमिष दाखवून पैशांची मागणी केली. पवार यांनी पैसे देण्यास नकार दिल्यानंतर आरोपीने ६ जानेवारी रोजी थेट तहसील कार्यालयात येऊन अश्लील शिवीगाळ व धमकी दिली.

तसेच फोन व व्हॉट्सॲपद्वारेही वारंवार पैशांची मागणी करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणी आरोपी अमजत पठाण व त्याच्यासोबत असलेल्या अज्ञात महिलेविरुद्ध कारवाईची मागणी करण्यात आली असून पुढील तपास उमरखेड पोलीस करीत आहेत. या घटनेमुळे कर्मचारी वर्गात खळबळ उडाली आहे.

# खून प्रकरणात तीन आरोपींना जन्मठेप

प्रतिनिधी १४ जानेवारी

**यवतमाळ** : नेर तालुक्यातील झोंबाडी परिसरात घडलेल्या गोकुळ पांडुरंग राठोड हत्याकांडात न्यायालयाने तीन आरोपींना जन्मठेप आणि दंड ठोठावला.

जग्गु पवार, आकाश पवार व पुनेशाही पवार रा. झोंबाडी अशी शिक्षा ठोठावलेल्या आरोपींची नावे आहे. दिनांक ०६/१०/२०२२ रोजी मृतक गोकुळ पांडुरंग राठोड, रा. झोंबाडी, ता. नेर हा दुपारी बैल व म्हशी चारण्यासाठी शेतात गेले होते. या दरम्यान आरोपी जग्गु पवार, आकाश पवार व पुनेशाही पवार यांनी त्यांच्यावर काठी व गोट्यांनी हल्ला केला व नर्सरीतील जंगलात उचलून फेकले. प्रत्यक्षदर्शी उमेश शंकर राठोड यांनी सांगितले की, सुमारे साडेचार वाजताच्या दरम्यान पावसात आरोपींनी गोकुळ राठोड यांना मारहाण करून पळसाच्या झाडाजवळ जमिनीवर फेकले. मृतकाच्या छातीवर गोलाकार जखमा होत्या आणि मानेला लालसर ठसे होते. शवविच्छेदन डॉ. चिमनानी यांनी केले, ज्यात मारहाण स्पष्ट झाली.

तपासात आरोपी आकाश पवार यांनी पंचसमक्ष गुन्ह्याची कबुली दिली. पोलीस उपनिरीक्षक गणेश हिरुळकर यांच्या मार्गदर्शनाखाली छगन राठोड, दिनेश राठोड, राजेश नाईक आणि भरत पवार यांनी साक्ष दिली. सुनावणीत जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश १, यवतमाळ एस. यु. बघेले यांनी आरोपी क्रमांक 1 जग्गु पवार यांना 80,000 रुपये दंड व दंड न भरल्यास 2 वर्ष अतिरिक्त कारावास, आरोपी क्रमांक 2 आकाश पवार यांना 30,000 रुपये दंड व 2 वर्ष अतिरिक्त कारावास, आरोपी क्रमांक 3 पुनेशाही पवार यांना 10,000 रुपये दंड व 2 वर्ष अतिरिक्त कारावास ठोठावला.

तसेच कलम 201 सह कलम 34 भा.द.वि. अंतर्गत प्रत्येकी 1 वर्ष कारावास व 2,000 रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. दंडाची रक्कम मृतक गोकुळ राठोड यांच्या आई-वडिलांना देण्याचे आदेश झाले. सरकारी पक्षाकडून जिल्हा सरकारी वकील नीती दवे यांनी युक्तीवाद केला.

# अखेर पुस नदीवरील पुलाला मिळाले 'संरक्षक कवच'

## 'वनभोजनाच्या' निमंत्रणाने प्रशासनाला फुटला घाम

प्रतिनिधी १४ जानेवारी



**महागाव** : प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात कधी कधी तक्रारींपेक्षा कल्पकतेने दिलेले 'निमंत्रण' अधिक परिणामकारक ठरते, याचा प्रत्यय महागाव तालुक्यात आला. हिवरा (संगम) येथील पुस नदीवरील पुलाच्या दुरवस्थेबाबत तरुण हरीश कामारकर यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना दिलेल्या 'वनभोजनाच्या' निमंत्रणाची चर्चा सोशल मीडियावर व्हायरल होताच प्रशासन खडबडून जागे झाले. महिनाभर दुर्लक्षित असलेल्या या पुलावर सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने काम करत मजबूत संरक्षक कठडे उभारले आहेत.

पुस नदीवरील हा पूल गेल्या अनेक दिवसांपासून धोकादायक बनला होता. तुटलेले कठडे, पथदिव्यांचा अभाव यामुळे येथे अपघातांची मालिका सुरू होती. वारंवार तक्रारी करूनही दखल घेतली जात नसल्याने हरीश कामारकर यांनी उपरोधिक शैलीत गडकरींना पत्र लिहून 'वनभोजनाचे' निमंत्रण दिले. हे पत्र चर्चेचा विषय ठरताच विभागाने कारवाईच्या भीतीने युद्धपातळीवर काम सुरू केले. या उपक्रमामुळे १० ते १५ गावांचा दळणवळणाचा मार्ग सुरक्षित झाला आहे. एका सामान्य तरुणाच्या धाडसी व कल्पक प्रयत्नामुळे प्रशासनाची अनास्था दूर झाली. हिवरा संगमसह परिसरातील नागरिकांनी हरीश कामारकर यांचे आभार मानत हा उपक्रम प्रेरणादायी असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

# राजमाता जिजाऊ जन्मोत्सव; स्वच्छतेचा संदेश, विद्यार्थ्यांचा गौरव

प्रतिनिधी १४ जानेवारी




**पुसद** : राजमाता जिजाऊ यांच्या जन्मोत्सवानिमित्त कर्मयोगी संत गाडगेबाबा स्मृतीस्थळ, जाधव बाग, पार्डी रोड, निंबी येथे विविध सामाजिक उपक्रमांसह उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी राजमाता जिजाऊ व बाल शिवराय यांच्या मूर्तीचे तसेच स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

माणुसकीची भिंत, पुसद यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात मिशन ग्रीन बहुउद्देशीय संस्था, माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशन, गीताई सेवा केंद्र, निसर्ग संवाद, नाम फाउंडेशन, प्रगत निर्माण संस्था व वसुंधरा बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने "प्लास्टिक प्रदूषणाशी लढा देऊया व आपले पुसद स्वच्छ व सुंदर करूया" या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशनच्या उपक्रमासाठी ५० हजार रुपयांची भांडी देऊन मदत करणारे दीपकभाऊ आसेगावकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून पुसद नगरपालिकेच्या नवनिर्वाचित अध्यक्षा मोहिनीताई इंद्रनिलभाऊ नाईक उपस्थित होत्या. त्यांनी सामाजिक उपक्रमांतून स्वच्छतेचा आणि सेवाभावाचा संदेश दिला.

व्यासपीठावर माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशनचे मार्गदर्शक दत्तात्रय जाधव, भीम टायगर सेनेचे किशोर कांबळे, ज्ञानदीप अकॅडमीचे कौस्तुभ धुमाळे, नाम फाउंडेशनचे स्वप्निल देशमुख, मुख्याध्यापक गजानन वायकुळे, पोलीस पाटील रामराव काळे आदी उपस्थित होते.

यावेळी सामाजिक कार्यात योगदान देणारे सुमित टेटर, दिनेश ठाकरे, शैलेश कोटूरवार तसेच प्रतिकूल परिस्थितीत मुलांना शिक्षण देणाऱ्या संध्याताई सुशांत महल्ले यांचा सत्कार करण्यात आला. पुसद उपविभागीय अधिकारी आशिष बिजवल यांनीही उपस्थित राहून अभिवादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश डंबोळे यांनी केले, तर आभार पवन बोजेवार यांनी मानले. कार्यक्रमास विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षक समिती पांढरकवडातर्फे चेतना मेळावा व मार्गदर्शन शिबीर

प्रतिनिधी १४ जानेवारी




**पांढरकवडा** : महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती शाखा पांढरकवडा यांच्या वतीने स्थानिक लोकमंगल कार्यालयात शिक्षकांसाठी भव्य चेतना मेळावा व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष नानासाहेब नाकाडे होते तर उद्घाटन बाबासाहेब कपिले, संस्थापक जिल्हा शिक्षक समिती व माजी राज्य सरचिटणीस यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाला गजानन देऊळकर, किशोर सरोदे, इनायत खान, रविंद्र उमटे, महेश सोनेकर, सुनिता जतकर, सुरेंद्र लिंगरवार, चेले, गोकुळ गंधे, गौतम सामृतवार, विजया राऊत, दिनेश घाटोळ, शीतल आमले तसेच सर्व तालुक्याचे शिक्षक समिती अध्यक्ष व सचिव उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचा शाल, श्रीफळ व स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. स्वागतगीत उज्जैन गेडाम यांनी सादर केले. कार्यक्रमात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तसेच विविध स्पर्धांमध्ये निवड झालेल्या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. ऑनलाईन बदलीने रुजू झालेल्या शिक्षकांचेही स्वागत करण्यात आले.

प्रास्ताविकात विजय मालकापुरे यांनी शिक्षकांच्या विविध समस्यांवर समिती सातत्याने आवाज उठवत असल्याचे सांगून शिक्षकांनी संघटित राहण्याचे आवाहन केले. उद्घाटन करताना बाबासाहेब कपिले यांनी पांढरकवडा शाखेच्या कार्याचे कौतुक केले. गजानन देऊळकर यांनी शिक्षकांच्या प्रश्नांवर समितीची भूमिका स्पष्ट केली, तर किशोर सरोदे यांनी वस्तुनिष्ठ विचारांनी संघटनेचे कार्य पुढे नेण्याचे आवाहन केले.

महेश सोनेकर यांनी अशा मेळाव्यांची गरज अधोरेखित केली, तर सुनिता जतकर यांनी महिलांनी नेतृत्वात पुढे येण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात नानासाहेब नाकाडे यांनी शिक्षण क्षेत्रातील सद्यस्थिती व आव्हानांवर प्रकाश टाकत शिक्षक समितीच्या संघर्षमय वाटचालीचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन दिनेश घाटोळ व शीतल आमले यांनी केले. शिक्षक समिती पांढरकवडा शाखेचे अध्यक्ष विजय मालकापुरे, सचिव कवडू गेडाम, कार्याध्यक्ष आशिष चव्हाण, कोषाध्यक्ष प्रशांत आमडे, जिल्हा संघटक आनंद खनके, संघटक विलास सामृतवार, उपाध्यक्ष रमेश कावडे, अविनाश ताकसांडे, राजेंद्र बुर्रेवार, कार्या. सचिव सोमेश्वर पौनीकर यांच्यासह अनिल येडलावार, कैलास मडावी, अमृत गंद्रतवार, दिनेश घाटोळ, पवन बोम्मावार, दिलीप पटले, अनुप बक्कीवार, शंकर तवटे, प्रकाश जगताप, प्रवीण ताटकुंटवार, नंदकिशोर आंबटकर, उत्तमसिंग ठाकूर, कमलेश पाल, विजय काळे, समीर कुरटकर, फिरोजखान पठाण, उद्धव कोडापे, विशेष चांदेकर, व्यंकटेश पार्लावार, मनोज खैरे, गजानन गेडाम, उमेश मेश्राम, प्रदीप येल्के, भारत करमनकर, रविंद्र पडलवार, राजू उप्पुवार, प्रवीण सिडाम, महेंद्र इंगळे, महेंद्र मेश्राम, सुनिता गेडाम, चंदा केराम, मंजू सुब्बनवार, शीतल तिवस्कर, अनुराधा भादिकर, जया सोनकुसरे, जया रेकावार, इंदिरा जुमनाके, वंदना कोवे, रेखा गेडाम, कविता वनकर, सुवर्ण धुर्वे, नीता गेडाम यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# जिल्हा परिषदेच्या १०५ शाळांमध्ये शिक्षक नाहीत; विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात

## ई-मेलद्वारे मुख्यमंत्री व प्रशासनाकडे शिक्षकांची मागणी

प्रतिनिधी १४ जानेवारी

**झरी जामणी** : झरी–जामणी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची तीव्र कमतरता निर्माण झाली असून, याचा गंभीर फटका थेट विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर बसत आहे.

तालुक्यातील एकूण ११५ जिल्हा परिषद शाळांपैकी तब्बल १०५ शाळांमध्ये नियमित (परमनंट) शिक्षकांची भरती अद्याप झालेली नाही. काही शाळांमध्ये एकच शिक्षक संपूर्ण शाळेचा कारभार पाहत असून, तर अनेक शाळांमध्ये दोन ते तीन शिक्षकांची पदे रिक्त आहेत. एकूण १०५ शिक्षक पदे रिक्त असल्याने संपूर्ण शिक्षण व्यवस्था कोलमडण्याच्या मार्गावर आहे.

शैक्षणिक वर्षाचा अर्धा अभ्यासक्रम पूर्ण होत असतानाही शिक्षक उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत आहे.

झरी–जामणी हा आदिवासी बहुल तालुका असून, येथील विद्यार्थी आधीच सामाजिक व आर्थिक अडचणींशी झुंज देत आहेत. अशा परिस्थितीत शिक्षकांचा अभाव म्हणजे त्यांच्या शिक्षणावर अन्यायच असल्याची भावना पालकांमध्ये तीव्र होत आहे.

अनेक शाळांमध्ये एका शिक्षकावर पहिली सर्व वर्ग सांभाळण्याची जबाबदारी टाकण्यात आली आहे. परिणामी अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होत नाही, विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देता येत नाही आणि शिक्षणाची गुणवत्ता घसरत आहे. शाळा आहेत; मात्र शिक्षण नाही, अशी वेदनादायक परिस्थिती आज आदिवासी भागात स्पष्टपणे दिसून येत आहे.

या गंभीर परिस्थितीकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ता योगेश मडावी यांनी मा. मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ई-मेलच्या माध्यमातून सविस्तर व विनम्र निवेदन पाठवून तात्काळ परमनंट शिक्षक भरतीची मागणी केली आहे.

तसेच, कायमस्वरूपी भरती पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी कंत्राटी शिक्षकांची तातडीने नियुक्ती करावी,अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार दि. १४ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## लोणीच्या कोमल बोडखेची राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी



**रिसोड :** तालुक्यातील लोणी बुद्रुक येथील श्री सखाराम महाराज विद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी कोमल गणेश बोडखे हिने क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शैक्षणिक सत्र २०२५–२६ मध्ये खुल्या वयोगटात खेळल्या जाणाऱ्या क्रीडा स्पर्धांमध्ये हॉलीबॉल शूटिंग या खेळ प्रकारात शालेय स्तरावरून निवड होत थेट राज्यस्तरीय स्पर्धेत महाराष्ट्र राज्य संघात तिची निवड झाली.यानंतर तिची राष्ट्रीय संघामध्ये निवड होऊन तिला राष्ट्रीय स्तरावर खेळण्याची संधी मिळाली. या राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातून एकूण ४५ संघ सहभागी झाले होते. या चुरशीच्या स्पर्धेत महाराष्ट्र राज्य संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम विजेतेपद पटकावले.आपल्या या यशाचे श्रेय कोमल हिने शाळेचे अध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक तसेच आई-वडिलांना दिले आहे. तिच्या या घवघवीत यशामुळे केवळ शाळा व परिसरातच नव्हे तर संपूर्ण वाशिम जिल्ह्यात तिचे अभिनंदन कौतुक होत आहे.

## कर्तव्याची नाही जान, भ्रष्टाचारालाच मान,

# कृषी अधिकाऱ्यांनी केली शेतकऱ्याला मारहाण !

***मारहाणीचा व्हिडीओ व्हायरल *मंगरूळपीर तालुक्यातील गोगरी शेतशिवारातील घटना**

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

मंगरूळपिर तालुक्यातील गोगरी मध्ये तालुका कृषि अधिकाऱ्याच व्हिडीओ का काढला याचा राग धरून एका शेतकऱ्याला कृषि अधिकाऱ्याने मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. सचिन कांबळे असे या कृषि अधिकाऱ्याचा नाव असून ऋषिकेश पवार असं मारहाण झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. या घटनेनंतर शेतकऱ्याकडून कृषी अधिकाऱ्यावर कारवाईची मागणी होत आहे. या भ्रष्टकृषी अधिकाऱ्याला कर्तव्याचे जान नसून फक्त भ्रष्टाचारालाच मान देत आहेत. त्यामुळे चिडलेल्या कृषी अधिकाऱ्याने थेट शेतकऱ्याला मारहाण केली.

वाशिम जिल्ह्याच्या मंगरूळपीर तालुक्या अंतर्गत असलेल्या गोगरी मध्ये मनरेगा अंतर्गत लागवड केलेल्या फळबागेची मजुरी मागील चार महिन्यांपासून रखडली होती..हे अनुदान मिळण्याच्या मागणीसाठी जिल्हा कृषी अधिकाऱ्यांकडे शेतकऱ्यांनी तक्रार केली होती.दरम्यान कृषी





अधिकारी आज पाहणीसाठी आले असतांना एका शेतकऱ्याकडून कृषी अधिकाऱ्याचं पाहणी करतानाचा व्हिडिओ काढत होता. या तक्रारीचा राग मनात धरून व्हिडिओ का काढतो म्हणत थेट कृषी अधिकाऱ्याने शेतकऱ्याला मारहाण करून बूट उगारला आणि अश्लील शिवीगाळ सुद्धा करण्यात आली आहे.इतकेच नव्हे कृषी अधिकाऱ्याकडून शेतकऱ्याचं मोबाईल सुद्धा हिसकावण्यात आला आहे.या घटनेनंतर मारहाण करणाऱ्या तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळेवर कारवाईची मागणी होत आहे.मात्र आता या कृषी अधिकाऱ्यावर कारवाई होणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### पाहणीदरम्यान व्हिडीओ काढला अन् सत्तेचा माज उफाळला

तक्रारीनंतर तालुका कृषी अधिकारी पाहणीसाठी गोगरी येथे आले असताना, एका शेतकऱ्याने पाहणीचा व्हिडीओ मोबाईलमध्ये चित्रीत केला. याच गोष्टीचा राग मनात धरत 'व्हिडीओ का काढतोस' असे म्हणत कृषी अधिकाऱ्याने शेतकऱ्यावर हल्ला केला, बूट उगारून मारहाण केली, अश्लील शिवीगाळ केली, आणि शेतकऱ्याचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावून घेतला. शेतकऱ्यांमध्ये संताप, कारवाईची जोरदार मागणी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आलेल्या अधिकाऱ्यांकडूनच अशी गुंडगिरी आणि दादागिरी झाल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. 'हा अधिकारी शेतकऱ्यांचा सेवक आहे की मालक' असा सवाल उपस्थित केला जात आहे. मारहाण करणाऱ्या तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळे यांच्यावर तात्काळ निलंबन व फौजदारी कारवाई करावी, अशी जोरदार मागणी शेतकरी व सामाजिक संघटनांकडून केली जात आहे.

### मनरेगा फळबाग मजुरी चार महिने रखडलेली...

गोगरी शिवारात मनरेगा अंतर्गत लागवड केलेल्या फळबागेची मजुरी मागील चार महिन्यांपासून रखडलेली आहे. वारंवार पाठपुरावा करूनही मजुरी न मिळाल्याने संतप्त शेतकऱ्यांनी जिल्हा कृषी अधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती.

### कारवाई होणार की प्रकरण दडपले जाणार?

शेतकऱ्यांवर हात उचलणाऱ्या अधिकाऱ्यावर प्रशासन कठोर कारवाई करणार का?की नेहमीप्रमाणे हे प्रकरणही फाईलमध्ये गाडले जाणार याकडे आता संपूर्ण वाशिम जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात


### उत्कर्ष अठोर याला मिळाले प्रोत्साहन पर बक्षीस

• सिटी न्युज ब्युरो @ कारंजा •



गुरुकुल विद्यालय कोळी कारंजा या ठिकाणी तालुका स्तरीय विद्न्यान प्रदर्शनी मध्ये जैव विद्युत् घटापासून विद्युत् निर्मिती करणे या मॉडेलला प्रोत्साहन पर बक्षीस प्राप्त झाले. धातूच्या पट्या व झाडांची रसाळ पाने वापरून उत्कर्ष अठोर यांनी विद्युत् घट तयार करून LED लॉईड तसेच कॅल्क्युलेटर त्यावर चालू शकतात असे आपल्या मॉडेलच्या माध्यमातून माहिती दिली.उत्कर्ष अठोर हा जि.प.प्राथमिक शाळा मोखड पिंपरी या शाळेचा विद्यार्थी असुन आपल्या यशाचे श्रेय ते मुख्याध्यापक चौधरी सर, दहातोंडे सर, मुंदे मॅडम, रूपाली सरोदे मॅडम तसेच आई वडिलांना दिले.मॉडेल करीता सरोदे मॅडम यांनी मार्गदर्शन केले.

### पिंप्री अवगण येथे युवा दिन उत्साहात साजरा



• सिटी न्युज ब्युरो @ कारंजा •

पिंप्री अवगण येथील परमहंस झोलेबाबा विद्यालय तथा स्व. मधुकरराव ल. सपकाळ कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालयात जिजामाता व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त युवा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. सुनिल सपकाळ साहेब उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे दीक्षित कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. दिव्या राठोड हिने केले, तर आभार प्रदर्शन गोपाल , यांनी केले. कार्यक्रमाला राठोड , गौपाल भुसारी , दीक्षित , कुलकर्णी , शिंगणे , वानखडे , लांभाडे , गोगे , गोरव, अवगण सर तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी सतीश ग्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप पसायदान पठणाने करण्यात आला. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी जिजामाता व स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचा संकल्प व्यक्त केला.

### य. च.महाविद्यालयात युवा दिनानिमित्त व्याख्यान



• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

य.च. महाविद्यालयात युवक दिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे तर प्रमुख वक्ते म्हणून श्री निलेश तुळजापुरे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी, डॉ. श्रीकांत रासेकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अनुश्री मुळे हिने केले तर उपस्थितांचे आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मधुकर ताकतोडे यांनी मानले.

## लुटण्याचे सुत्र, सर्वांचे एकच गोत्र, वाशिम न.प. मध्ये भोजनभाऊ एकत्र !

सध्या महाराष्ट्रात भाजपा विरुद्ध उबाठा असा संघर्ष पराकोटीला पोचलेला दिसतो.दोन्ही बाजूंनी लाखोळी वाहून तोंडं पार विटाळून गेली असली तरी वाशिममध्ये मात्र भाजपा उबाठात मंगल परिणय घडून आलेला दिसतो. काल वाशीम नगर परिषद च्या उपाध्यक्ष पदाची निवड पार पडली. निवडणूक अधिकाऱ्यांनी नियमानुसार निवडणूक कार्यक्रम लावला.वाशीममध्ये महाविकास आघाडी म्हणून १५ तर भाजपाचे १४ असे संख्याबळ आहे.एमआयएम चे २ आणि अपक्ष १ असे उर्वरित सदस्य आहेत.गरज पडल्यास अध्यक्षाचे १ मत भाजपचे आहेच.एकंदर पराकोटीचा विचार केला तर भाजपाकडे १६ तर महाविकास आघाडी कडे १७ असे संख्याबळ धरायला हरकत नव्हती. थोडक्यात इमानेइतबारे निवडणूक घेतली तर एक मताने उबाठाचा उमेदवार निवडून येणारच होता.हातखंडे वापरले असते तर कदाचित भाजपाला संधी मिळाली असतीही. आकडेमोड सोडून द्या.पण लोकशाही पद्धतीने निवडनुक होणे वाशीमकरांना अपेक्षित होते. पण निवडणूक प्रक्रिया सुरू होताना केवळ उबाठाने उपाध्यक्ष पदाचा अर्ज भरला आणि भाजपाने मात्र रणछोडदास भूमिका घेतली.

निवडून येणार नाही हे माहीत असले तरी सभागृहात मत विभाजन करून निवडणूक घेणे अपेक्षित होते.मतदान व्हायलाच पाहिजे होते.पण तसे न होता भाजपाने उबाठाला रान मोकळे करून दिल्याने वाशिमकर जनतेत शंकेला पेव फुटले आहे. सगळे भोजनभाऊ एकत्रित आले असून मिलीजुली सरकार म्हणजे मिलबाटके सरकार असे ठाम मत जनतेचे झाले आहे.सभापती पदे देखिल वाटून घ्यायची आणि तेरी भी चूप आणि मेरी भी चूप



असे या पुढे होणार आहे.खर तर वाशिमकरांनी नगराध्यक्ष म्हणून भाजपाला प्राधान्य दिले आणि नगर सेवक म्हणून विरोधकांना बहुमत दिले.हा वाशीमकर जनतेचा विवेक आणि हुशारी आहे.पण जनतेचा कौल झुगारून या सर्वांनी तुम्ही आम्ही खेळी मेळी ,गदारोळी आनंदे अशी भूमिका घेऊन जनतेचा भ्रमनिरास केला आहे.चोराचे भाऊ डाकू एकत्र आले तर कसे होईल तसेच नगर परिषद मध्ये यापुढे होणार आहे. ही जनमताची प्रतारणा ठरणार आहे. यापूर्वी देखिल वाशीम नगर परिषद मध्ये अशीच मिलीजुली सरकार असायची.ना कोणते तत्व ना नैतिकता.सर्वांनी अनैतिक एकत्र यायचे, एकत्रित अनैतिक ठराव घ्यायचे, जनमताला फाट्यावर ठेवून निर्णय घ्यायचे आणि भ्रष्ट आचार करायचा.हे सर्व जनतेच्या छाताडावर पाय ठेऊन बिनदिक्कत करायचे.जनता देखिल हे सर्व निमूट सहन करायची.आता यापुढेही तसेच होणार यात शंका नाही.यापूर्वी झालेल्या भ्रष्टाचाराचा पाढाच वाशीमकरांना माहीत आहे.यापुढे भ्रष्टाचार होऊ नये या जाहिरनाम्यावर लोकांनी प्रतिनिधी निवडून दिलेत.पण जनतेच्या मताचा वध करून केलेला मेळा वाशीमकरांना पटलेला नाही.आता हे सब घोडे बाराटक्के होणार आणि मागील भ्रष्टाचार अधिकृत करणार हे सर्वांना कळले आहे. उपाध्यक्ष उबाठाचाच होणार असला तरी लोकशाही पद्धतीने मतदान प्रक्रिया करून मतदान केले असते तर जनतेने शुद्ध भाव ठेवला असता.कारंजा नगरपरिषदेत अशीच स्थिती असूनही त्यांनी मतदान घेतले.इथे वाशीममध्ये मात्र चोरबाजार केला. सर्वांनी एकत्र शिजवून एकाच तंबूत एकत्र भोजन करण्यास प्रारंभ केल्याने यांचे इरादे पक्के दिसून येताहेत.लढून पडले असते तर लोकेशना टळली असती पण पळून पडल्याने लोकनिंदेस पात्र ठरणे बरे नव्हे !आता वाशीमकरांनी सतर्क आणि सजग राहण्याची आवश्यकता आहे.अन्यथा ही मंडळी गाव विकून खातील आणि कुणाला काहीही कळणार नाही.तस्मात वाशिमकरांनो जागे रहा !

**विद्यावाचस्पती**
**प्रा.दिलीप जोशी, वाशिम.**
**९८२२२६२७३५**

## वाशीम कृषी उत्पन्न बाजार समितीत चणा खरेदी सुरू



• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये नवीन चण्याचा मुहुर्त दिनांक १३ जानेवारी रोजी निघाला असून पहिल्याच दिवशी सळ्या भावाने हराशी झालेल्या चण्याला ५०५१ रुपये भाव मिळाला नवीन चण्याचा शुभारंभ करण्या साठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती महादेवराव काकडे गुरुजी, उपसभापती गोवर्धन पाटील, चव्हाण, संचालक राजुभाऊ चौधरी संचालक सुरेश भाऊ भोयर,, संचालक हिराबाई जानेवाले व व्यापारी आणि आडते व शेतकरी हजर होते या निमित्ताने संबंधित शेतकऱ्याचा अडत्याचा आणि व्यापाऱ्याचा शाल टोपी श्रीफळ देऊन टोपी देऊन सत्कार करण्यात आला.

## शिवसेनेचे विष्णू कदम यांची उपाध्यक्षपदी निवड

**स्वीकृत सदस्यपदी भाजपाचे अक्षय देशमुख आणि उबाठाचे सुधाकर देशमुख यांची नियुक्ती**

• सिटी न्युज ब्युरो @ रिसोड •







नगर परिषदेच्या उपाध्यक्ष पदाची निवडणूक आज १३ जानेवारी रोजी नगरपालिका सभागृहात पार पडली असून यामध्ये शिवसेना (शिंदे गट) भाजप महायुतीचे विष्णू भगवान कदम हे विजयी झाले उपाध्यक्ष पदासाठी शिवसेना (शिंदे गटा) चे विष्णू कदम यांनी तर महाविकास आघाडीतर्फे काँग्रेसच्या सुरेखा रवी दांदडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. यावेळी झालेल्या निवडणुकीत विष्णू कदम यांना १५ तर सौ. दांदडे यांना आठ मते मिळाली. यामध्ये विष्णू कदम यांना विजयी घोषीत करण्यात आले. तसेच स्वीकृत सदस्यांमध्ये भाजपचे गटनेते ॲड. कृष्णा आसनकर यांनी अक्षय शिवाजीराव देशमुख यांचे नाव स्वीकृत सदस्यासाठी दिले. तर महाविकास आघाडी तर्फे गटनेते बंडू वानखेडे यांनी (उबाठा) चे

सुधाकर देशमुख यांचे नाव दिले

यावेळी पिठासिन अधिकारी नगराध्यक्ष भगवानराव शिरसागर यांनी या दोन्ही नावांची घोषणा केली. निवडणूक निकाल जाहीर होताच कार्यकत्यांनी फटाके फोडून जल्लोष साजरा केला. निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर उपाध्यक्ष विष्णू कदम व स्वीकृत सदस्य अक्षय देशमुख यांनी माजी खासदार अनंतराव देशमुख यांचे कार्यालयात जाऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. तसेच आमदार भावनाताई गवळी यांच्या कार्यालयात सुद्धा शिवसेना जिल्हाप्रमुख महादेवराव ठाकरे यांच्या उपस्थितीत जल्लोष

साजरा करण्यात आला. पिठासिन अधिकारी म्हणून नगरपालिकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष भगवानराव क्षीरसागर यांनी काम पाहिले. यावेळी मुख्याधिकारी सतीश शेवदा व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. नगरपालिका निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टी व शिवसेना शिंदे गट यांची युती होती. त्यानुसार नगराध्यक्षासह भारतीय जनता पार्टीचे दहा नगरसेवक निवडून आले. तर शिवसेना शिंदे गटाचे पाच नगरसेवक विजय झाले. तसेच महाविकास आघाडीचे आठ नगरसेवक विजयी झाले. यावेळी निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडली.

## न.प. उपाध्यक्षपदासाठी नाही झाला विरोध, राजू भांदुर्गे अविरोध !

**स्वीकृत सदस्य म्हणून उबाठाचे रेखा मापारी तर भाजपचे निलेश जीवनाणी व गणेश खंडाळकर**

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

वाशिम नगर परिषदेमध्ये ठाकरे सेनेचे राजू भांदुर्गे यांची उपाध्यक्षपदी अविरोध निवड झाली. भाजपने उपाध्यक्ष पदासाठी आपला उमेदवार उभा न केल्यामुळे अप्रत्यक्ष मदत केली आहे. त्यामुळे भांदुर्गे यांच्या उपाध्यक्ष पदासाठी विरोध झालाच नाही. तर स्वीकृत सदस्य म्हणून शिवसेना उध्दव ठाकरे गटाच्या वतीने सौ. रेखा सुरेश मापारी तर भाजपाच्या वतीने निलेश जीवनाणी व गणेश खंडाळकर यांची निवड झाली आहे.त्यामुळे सत्ते आता तुम्ही आम्ही भाऊ मिळून मिसळुन खाऊ.

वाशिम नगरपरिषदेच्या उपाध्यक्ष पदासाठी होत असलेल्या निवडणूकीत ठाकरे सेनेचे राजू भांदुर्गे यांची बिन विरोध निवड झाली आहे.वाशिम नगर परिषदेमध्ये भाजप आणि ठाकरे सेनेकडे बहुमतासाठी असलेलं संख्याबळ नसल्यामुळे नगर परिषदेमध्ये उपाध्यक्ष पदासाठी पेच निर्माण झाला होता. त्यानंतर आज ठाकरे सेनेकडून उपाध्यक्ष पदासाठी एकमेव अर्ज आल्याने ही निवड बिनविरोध झाली आहे.



वाशिम नगर परिषदेमध्ये भाजपचे १४ उमेदवार निवडून आले आहेत. तर ठाकरे सेनेचे १३ नगरसेवक विजयी झाले आहेत. तर काँग्रेसचे २ ठिकाणी नगरसेवक निवडून आले आहे. एमआयएमचे २ नगरसेवक विजयी झाले असून १उमेदवार अपक्ष निवडून आला आहे. त्यामुळे उपाध्यक्ष पदासाठी लागणारे १७ उमेदवारांच संख्याबळ कुणाकडेच नव्हतं.या निवडणुकीत एमआयएमचे दोन नगरसेवक मात्र या निवडणुकीच्या प्रक्रियेत उपस्थित नव्हते.त्यामुळे ठाकरे सेनेकडून राजू भांदुर्गे यांची नगर परिषदेच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध झाली आहे.तसेच वाशीम नगर परिषदेच्या स्वीकृत सदस्य पदी उबाठाच्या रेखा सुरेश मापारी आणि भाजपाकडून गणेश खंडाळकर, निलेश जीवनानी यांची यांची निवड झाली आहे.मात्र, दुसरीकडे भाजपने उपाध्यक्ष पदासाठी आपला उमेदवार उभा न केल्यामुळे अप्रत्यक्ष ठाकरेसेनेला मदत केल्याची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.





### विचित्र युती, विरोधकांची माती, विकासाची कशी वाढणार गती...

### तुम्ही आम्ही भाऊ, मिळून मिसळुन खाऊ !

निवडणुकीत विरोधात लढले , कार्यकर्त्यांनी विजयासाठी खालच्या स्तरावर भांडणे केले. विजयी झाल्यावर सत्तेसाठी नगर पालिकेत उपाध्यक्षपदासाठी विरोधच झाला नाही. त्यामुळे आता विरोधी पक्षच उरला नाही. सभेत विरोधी पक्ष राहीला नसल्याने काही करा, तुम्ही आम्ही भाऊ भाऊ मिळून मिसळुन खाऊ असे आता होणार आहे. कशालाच विरोध होणार नाही.हे सिध्द झाले आहेत. कशाची युती अन् कशाची आघाडी सर्व सामान्यांच्या जीवनाची मात्र होणार बिघाडी अशी विचित्र बसली नगर पालिकेत घडी. अशा राजकारणामुळे विरोधकांची माती झाली असून आघाडीची विचित्र युती झाली आहे. त्यामुळे विकासाची गती कशी वाढणार याकडे शहर वासीयांचे लक्ष लागले आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

बुधवार, दि. १४ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## लोकशाही मजबूत करण्यासाठी मतदान करा

प्रतिनिधी १४ जानेवारी

**अकोला :** १५ जानेवारी रोजी अकोलेकरांनी मोठ्या प्रमाणात मतदान करावे असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले तर लोकशाहीच्या उत्सवात प्रत्येकाने सहभागी व्हावे असे आवाहन एसपी अर्चित चांडक यांनी केले. लोकशाही मजबूत करण्यासाठी एकेका मताचे महत्त्व आहे असे आवाहन केले. तसेच महापालिका आयुक्त डॉ.सुनील लहाने यांनीही मतदारांना आवाहन केले.

अकोला महानगरपालिका

जनहित सर्वतोपरी

# शहरातील बिग फाईट वर चांगलीच चर्चा रंगली

### भाजप - राष्ट्रवादी महायुतीची चर्चा अधिक

प्रतिनिधी १४ जानेवारी

**अकोला :** अकोल्यात भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसची निवडणुक पुर्व युती झाली. दोन - चार जागा भाजपाने त्यांच्या मित्र पक्षांसाठी सोडल्या. पण, यामुळे इतर पक्षांची चांगलीच अडचण झाली. वंचितने राज्यात काही ठिकाणी काँग्रेस सोबत आघाडी केली. अकोल्यात केली नाही. भाजपचा मित्र पक्ष असलेल्या शिवसेना (शिंदे गट)ने अकोल्यात महायुतीचा घटक न होता स्वतंत्र चुल रचली. इतकेच नाही तर अकोल्यात मनसे ही राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) यांच्यासोबत एकत्र काही ठिकाणी लढली. तर शिवसेना (उबाठा) यांनी देखील महाविकास आघाडी सोबत उघड उघड आघाडी केल्याचे चित्र अकोल्यात नव्हते. अशा सर्व अकोल्यात एम आय एम ने काँग्रेस नेत्यांना चॅलेंज केल्याने अकोट चा मुद्दा अकोल्यात गाजला देखील. एकूणच ही निवडणूक विविध राजकीय समीकरण आणि

### वंचित विरुद्ध काँग्रेस

परिस्थितीत अकोल्यात भाजप च्या अनेकांना तिकिट नाकारले जाणे, त्या पैकी काहींनी उमेदवारी दाखल करणे यामुळे ही निवडणुक रंगली. इतकेच नाही तर अकोट येथील एम आय एम आणि भाजप युतीची चर्चा राज्यात सर्वाधिक झाली. आघाड्यांनी गाजली. पण, महापालिकेचे प्रश्न, स्थानिक मुद्यांना या निवडणुकीत काही जास्त प्रतिष्ठा मिळाली नाही. शहरातील राजकारण सध्या या 'बिग फाईट्स' भोवती फिरत आहे. प्रत्येक पक्षाने आपल्या 'फायरब्रँड' नेत्यांना मैदानात उतरवले होते. प्रस्थापित नेत्यांना रोखण्यासाठी विरोधकांनी चक्रव्यूह रचला आहे. आता मतदारांचा कल कोणाकडे झुकतो आणि अकोल्याच्या सत्तेची चावी कोणाच्या हातात जाते, याचा फैसला मतपेटीतूनच होईल.प्रभाग निहाय जाहीर झालेल्या उमेदवारीनंतर आता प्रमुख लढतींचे चित्र स्पष्ट झाले असून, शहरातील 'बड्या' नेत्यांच्या वर्चस्वासाठी ही निवडणूक 'आर-पार'ची लढाई ठरणार आहे. भाजप, वंचित बहुजन आघाडी, काँग्रेस आणि शिवसेना या चौरंगी लढतीत कोण कोणाची बाजी उलटवणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. उद्या होणारे मतदान हे कोण बलवान हे ठरविणार आहे.

### शिवसेना विरोधात शिवसेना

### एम आय एम विरोधात काँग्रेस

### भाजप विरुद्ध शिवसेना

**नायगाव** आणि अकोट फाईलमध्ये 'वंचित' विरुद्ध 'काँग्रेस' प्रभाग १ (क) नायगावमध्ये काँग्रेसच्या निलोफर खान सोहेल खान आणि वंचितच्या भुरी बद्रोदीन यांच्यात काटाजोड लढत होत आहे. तर प्रभाग २ (अ) **अकोट फाईलमध्ये** काँग्रेसच्या अर्चना कांबळे आणि वंचितच्या वंदना वासनिक या महिला रणरागिणी एकमेकींसमोर ठाकल्या आहेत. येथे दलित आणि मुस्लिम मतांच्या ध्रुवीकरणावर विजयाचे गणित अवलंबून असेल.

**जठारपेठ** प्रभाग ३ (ड) मध्ये वंचितचे युवा नेते सामाजिक कार्यकर्ता निलेश देव आणि भाजपचे युवा चेहरा सागर शेगोकार यांच्यात थेट संघर्ष आहे. तसेच रामदास पेठ प्रभाग ६ (ड) मध्ये भाजपचे पवन महल्ले विरुद्ध शिवसेनेचे राजेश जोशी अशी युवा नेत्यांची झुंज रंगणार असून, तरुणाईचा कौल कुणाकडे जातो हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. रामनगरमध्ये दिग्गज आमनेसामने प्रभाग ५ (ब) **रामनगर** येथे भाजपचे जयंत मसने आणि शिवसेनेचे मनिष मोहोड यांच्यात राजकीय दंगल पाहायला मिळत आहे. याच प्रभागाच्या 'ड' गटातून माजी महापौर विजय अग्रवाल यांची प्रतिष्ठा पणाला लागली असून, त्यांच्यासमोर शिवसेनेच्या दीपक गवारे यांनी तगडे आव्हान उभे केले आहे.

**तारफैलमध्ये** चुरस प्रभाग ७ (ड) तारफैलमध्ये महानगर विकास मंचचे सुनील मेश्राम आणि काँग्रेसचे शेख फरिद यांच्यात थेट सामना आहे. प्रभाग १० (अ) **शिवाजी नगरमध्ये** शिवसेनेच्या शितल गोतमारे आणि मंजुषा शेळके यांच्यात चुरस असून, याच प्रभागाच्या 'ड' गटात काँग्रेसचे विलास गोतमारे आणि शिवसेनेचे राहुल पाटील यांच्यात हाय-व्होल्टेज ड्रामा पाहायला मिळत आहे. मराठा, मुस्लिम आणि तेली समाजाच्या मते येथे निर्णायक ठरतील.

**बाजारपेठ** प्रभाग ११ (ड) बाजारपेठ क्षेत्रात काँग्रेसचे फायरब्रँड नेते डॉ. जीशान हुसेन आणि भाजपचे नवखे उमेदवार राहुल चौरसिया यांच्यात थेट संघर्ष आहे. प्रभाग १२ (ड) मध्ये युवा नेते सागर भारुका आणि भाजपचे माजी नगरसेवक अजय शर्मा यांच्यात लढत होत आहे. याच १२ क्रमांकाच्या प्रभागात 'क' गटात शिवसेनेच्या उषा विरक आणि अपक्ष सारिका अग्रवाल यांच्यातील सामना लक्षवेधी ठरणार आहे. प्रभाग १३ (ड) **कृषी नगरमध्ये** अपक्ष आशिष पवित्रकार यांनी भाजपचे अनिल मुरुमकार यांच्यासमोर तगडे आव्हान उभे केले आहे. **मलकापूर** प्रभाग १४ (क) मध्ये वंचितचे पराग गवई विरुद्ध शिवसेनेचे जगदीश मुरुमकार, तर 'ड' गटात शिवसेनेचे मंगेश काळे आणि वंचितच्या उमेदवारांमध्ये चुरस आहे.

**गोरक्षण रोड** प्रभाग १५ (अ) मध्ये हरीश आलिमचंदानी आणि मनसेचे पंकज साबळे यांच्यात सामना रंगणार आहे. **सिंधी कॅम्प** प्रभाग १६ (ब) मध्ये डॉ. मुस्कान पंजवानी आणि राष्ट्रवादीच्या अमरीन यांच्यात थेट लढत आहे, तर 'ड' गटात राष्ट्रवादीचे रफिक सिद्दीकी आणि भाजपचे संजय बडोणे यांच्यात प्रतिष्ठेची लढाई होत आहे.

**हरिहर पेठ** प्रभाग १७ मध्ये शिवसेनेचे राजेश मिश्रा आणि काँग्रेसचे आझाद खान यांच्यात कडवी झुंज होण्याची शक्यता मतदारांमध्ये चर्चेत आहे. तसेच प्रभाग २० **खडकी** (अ) मध्ये शिवसेनेचे विजय इंगळे आणि भाजपचे मंगेज झिने हे आमनेसामने ठाकले आहेत.

# विकासावर मतदार विश्वासाची मोहर लावतील

### भारतीय जनता पक्ष राष्ट्रवादी युतीला विश्वास

प्रतिनिधी १४ जानेवारी

**अकोला :** भारतीय जनता पक्षाने महानगरपालिका निवडणुकीत शिस्तबद्ध, नियोजनबद्ध तसेच विकास आणि हिंदुत्ववादी भूमिका घेऊन प्रचार केला. कोणत्याही पक्षावर टीकाटिपणी न करता विकासाचे मुद्दे मांडले. मतदारांमध्ये विश्वास जागवण्यात प्रचार यंत्रणा यशस्वी ठरली असा विश्वास व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अकोल्याच्या विकासाकडे असलेले सदैव लक्ष, खासदार अनुप धोत्रे, पालकमंत्री आकाश फुंडकर, आमदार रणधीर सावरकर आणि महानगरपालिकेमध्ये भाजपा नगरसेवकांनी केलेल्या कामकाजाला घेऊन निवडणुकीमध्ये प्रचारामध्ये आघाडी घेतली होती.

पक्षाने स्टार प्रचारक आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, पालकमंत्री आकाश फुंडकर, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार प्रकाश भारसाकळे, निवडणूक प्रभारी विजय अग्रवाल, जयंत मसने, संतोष शिवरकर, डॉ. अमित कावरे, सिद्धार्थ



शर्मा, एड. सुभाषसिंग ठाकूर, डॉ. अभय जैन, डॉ. किशोर मालोकार, कृष्णा शर्मा, अर्चना शर्मा, सुहासिनीताई धोत्रे, समीक्षाताई धोत्रे, प्रा. अनुप शर्मा, वसंत बाछुका, मंजुषाताई सावरकर, किशोर पाटील, सीमाताई पाटील, चंदाताई शर्मा, शितल रूपारेल, सोनल ठक्कर, गीतांजलीताई शेगोकार, वैशालीताई शेळके, श्रावण इंगळे, कृष्णा चव्हाण, डॉ. राजेश देशपांडे, गिरीश गोखले, विनोद मनवानी, तसेच ज्येष्ठ आणि नवीन कार्यकर्त्यांच्या सोबत घेऊन पक्षाने भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारासाठी प्रचार केला.

भाजप उमेदवारांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, इंदोरचे खासदार शंकर लालवानी, राज्यमंत्री संजय सावकारे यांनी भारतीय जनता पक्षाचे ६२ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे १४ उमेदवार यांच्या प्रचारासाठी जनसंपर्क अभियान राबवून विजयी करण्याचे आवाहन केले.

भाजपाचे स्टार प्रचारक आणि निवडणूक प्रभारी आमदार रणधीर सावरकर यांनी वेगवेगळ्या माध्यमातून अकोल्यातील चार लाख नागरिकांशी संवाद साधला तसेच तसेच साडेचारशे पेक्षा जास्त बैठकातून त्यांनी अभ्यासपूर्ण मांडणी केली. भाजपाला मतदान का याची विवेचन करून मतदारांची मते जिंकली वेगवेगळ्या प्रबुद्ध नागरिकांशी तसेच वेगवेगळ्या समाज बांधवांशी सुद्धा त्यांनी चर्चा विनिमय करून भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस साठी मत मागितली खासदार अनुप धोत्रे यांनी सुद्धा ३२२ ठिकाणी बैठका घेऊन महायुतीला विजयी करण्याचे आवाहन केले. जिल्ह्याचे पालकमंत्री ॲडव्होकेट आकाश कुंडकर यांनी शहरातील पंधरा प्रभागांमध्ये संपर्क साधला. भाजपा निवडणूक प्रभारी विजय अग्रवाल यांनी सुद्धा ३२७ ठिकाणी बैठका घेऊन नागरिकांशी चर्चा विनिमय करून भारतीय जनता पक्षाने महानगरपालिके केले आहेत केलेल्या कामकाजाचा अहवाल सादर केला आणि आगामी कार्यक्रमासंदर्भात चर्चा विनिमय केली महानगराध्यक्ष जयंत मसने मसने यांनी सुद्धा निवडणुकीमध्ये सक्रिय सहभाग घेऊन अनेक बैठकांमध्ये संवाद साधून समाजातील विविध घटकांशी संवाद साधून पदयात्रा बैठका यामध्ये मार्गदर्शन केले.

आमदार रणधीर सावरकर यांनी पदयात्रा सोबत बैठका भ्रमणध्वनी तसेच वेगवेगळ्या माध्यमातुन संवाद साधून भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. हिंदुत्व आणि राष्ट्रीयत्व समाजसेवा या मुद्द्याने सुद्धा भारतीय जनता पक्षाने जनतेचे मत जिंकली भारतीय जनता पक्ष प्रत्येकाच्या सुखदुःखासोबत स्वर्गीय गोवर्धनजी शर्मा आणि संजय भाऊ धोत्रे भाऊ साहेब पुंडकर, प्रमिलाताई टोपले शंकरलालजी खंडेलवाल, एडवोकेट दादा देशपांडे यांच्या विचारांना पुढे नेण्यासाठी वारसा कायम ठेवण्यासाठी महायुतीला विजयी करण्याचे आवाहन केले.

# आजपासून तीन दिवस शहरात तळीरामांचे हाल!



### तीन दिवस शहरात मोठ्या प्रमाणात होईल अवैध दारूची विक्री

प्रतिनिधी १४ जानेवारी

**अकोला :** राज्यात अकोला सह अन्य २८ महानगरपालिका च्या निवडणुकीचा थरार शिगेला पोहोचला असतानाच कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सरकारने आज बुधवार पासून ते मत मोजणी पूर्ण होईपर्यंत संबंधित महापालिका क्षेत्रात 'ड्राय डे' जाहीर करण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने महसूल विभागाच्या मार्गदर्शनाखाली हा निर्णय घेतला आहे. केवळ वाईन शॉप्सच नव्हे तर बार परमिट रूम आणि बियर शॉपी देखील या काळात पूर्णपणे बंद राहतील. निवडणुकीच्या काळात मतदारांना आमिष दाखवण्यासाठी दारूचा वापर होण्याची शक्यता असते, तसेच मद्यप्राशनामुळे वादाचे प्रसंग उद्भवून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये या उद्देशाने प्रशासनाने हा तीन दिवसाचा ड्राय डे जाहीर केला आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनाने मद्य विक्री वर कडक निर्बंध लादले आहेत. त्यानुसार १४ जानेवारी बुधवारी संपूर्ण दिवस मद्य विक्री बंद असणार आहे तर गुरुवारी १५ जानेवारी रोजी मतदान दिवस आहे, त्यामुळे मतदानानिमित्त दिवसभर दारूची दुकाने, बार आणि रेस्टॉरंट्स बंद राहणार आहेत. तर महापालिका निवडणुकीची मतमोजणी ही शुक्रवारी १६ जानेवारी रोजी होणार आहे त्यामुळे मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वाईन शॉप, बार अँड रेस्टॉरंट बंद राहणार आहेत. मतदान संपल्यानंतर सायंकाळी सहा वाजता दारूची दुकाने उघडणार आहेत. त्यानंतरच शहरातील तळीरामांना आपला गळा ओला करता येईल. सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणाऱ्यांवर आणि बेकायदेशीर रित्या मद्य साठा करणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर राहणार आहे. परंतु तीन दिवस दुकाने बंद राहणार असल्याने आधीच दारूची अवैध विक्री करणाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात दारूचा साठा करून ठेवला आहे. तीन दिवस अव्वाच्या सव्वा दराने दारू विकली जाईल त्यामुळे निवडणुकीच्या बंदोबस्तात गुंतलेल्या पोलिसांना बंदोबस्तात गुंतून राहावे लागत असल्याने या अवैध दारू विक्रेत्यांवर कोण कारवाई करेल हा प्रश्न सुद्धा निर्माण होत आहे.

# मतदान साहित्यासह पथके रवाना, यंत्रणा सज्ज

प्रतिनिधी १४ जानेवारी

**अकोला :** महानगर पालिका मतदानाची प्रक्रिया उद्या पार पडणार आहे. या करिता जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. या निवडणुकीत ४६९ उमेदवार निवडणूक रिंगणात असून उद्या ५ लाख ५० हजार हुन अधिक मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे.

या संपूर्ण प्रक्रिया करता ७ फिरती पथके, २२ स्थिर सर्वेक्षण पथके तसेच वेब कास्टिंग चे नियोजन



करण्यात आले आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार अकोला महानगरपालिका निवडणुक प्रकिया करिता प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. आज अकोला महानगरपालिका हद्दीतील पाचही झोन मधून मतदानाचे साहित्य ईव्हीएम मशीन मतदान केंद्रावर रवाना करण्यात. या प्रक्रियेसाठी २४ तास आदर्श आचारसंहिता कक्ष कार्यरत ठेवण्यात आले आहे मतदान केंद्रावर ईव्हीएम तसेच इतर मतदार साहित्य घेण्याकरिता कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आज महानगरपालिका हद्दीतील पाचही झोन मधून एकूण २२१ वाहनांमधून ईव्हीएम तसेच मतदानाचे साहित्य कर्मचारी घेऊन जात असून त्यांच्यासोबत पोलीस विभागाच्या कर्मचाऱ्यांची सुद्धा नियुक्ती करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रक्रियेचा आढावा घेतला आहे आमचे प्रतिनिधी सुरेश राठोड यांनी माहिती दिली.

# जुन्या वादातून चाकू हल्ला; दोघे जखमी

प्रतिनिधी १४ जानेवारी

**मूर्तिजापूर :** जुन्या वादावरून चाकूने हल्ला करून दोघांना जखमी केल्याची घटना ११ जानेवारी रोजी शेलुवेताळ येथील शासकीय निवासी शाळेजवळ सायंकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राप्त माहितीनुसार, समीर शासकीय निवासी शाळा शेलुवेताळ येथील घटना भांडण सोडविणाऱ्या युवकासही केले जखमी पसार आरोपीच्या शोधात ग्रामीण पोलीस जाधव रा. अनभोरा यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्याचा मित्र आशिष देशमुख याच्यासोबत जुन्या वादावरून आरोपींनी संगनमत करून वाद घालून आशिष देशमुख रा. कंझरा याच्या गालावर चाकूने मारून जखमी केले असता, फिर्यादी सोडविण्याकरिता गेला असता त्याच्याही मांडीवर चाकूने हल्ला केला.

# बेपत्ता मुलाला पोलिसांनी नातेवाईकांच्या ताब्यात दिले

प्रतिनिधी १४ जानेवारी

**अकोला :** मलकापूर पील कॉलनीतील मंगेश कटनकर यांचा भाऊ भूषण मुरलीधर कटनकर हा १५ वर्षीय मुलगा १० जानेवारी रोजी सकाळ पासून बेपत्ता होता. त्याचा अकोल्यामध्ये बस स्टॅन्ड, रेल्वे स्टेशन, आजुबाजुचे परीसरात, नातेवाईकाकडे शोध घेतला. परंतु तो आढळला नाही. खदान पोलिसांनी त्याचा शोध घेऊन नातेवाईकांच्या सुपुर्द केले.

भुषण मुरलीधर कटनकर याचा अकोला, शेगाव, बडनेरा, अमरावती येथील बस स्टैंड, रेल्वे स्टेशन व परिसरामध्ये शोध घेतला.



शोध घेत असताना माहिती मिळाली की तो मुर्तिजापुरला असल्याबाबत माहिती मिळाली. डि.बी. पथक तात्काळ रवाना झाले. त्यांनी मुलाचा शोध घेवुन तो रेल्वे स्टेशन मुर्तिजापुर जि. अकोला परिसरात मिळून आल्याने पो.स्टे. खदान ला मुलासह परत आले व त्यास त्याची आई व भाऊ यांच्या ताब्यात देण्यात आले.

एसपी अर्चित चांडक, बी. चंद्रकांत रेड्डी अप्पर पोलिस अधिक्षक, सुदर्शन पाटील उपविभागीय पोलीस अधिकारी, मनोज केदारे पोलीस निरीक्षक खदान यांचे मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी सपोनि योगेंद्र मोरे व सहकारी यांनी कामगिरी यशस्वी केली.

# हिदायत पटेल हत्या प्रकरणी मुख्य आरोपीच्या पोलिस कोठडीत ३ दिवसांची वाढ

प्रतिनिधी १४ जानेवारी

**अकोट :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हिदायत पटेल यांच्या खून प्रकरणातील मुख्य आरोपी उबेदखॉ राजीकखॉ पटेल उर्फ कालु याची १३ जानेवारी पर्यंतची पोलिस कोठडी संपल्यानंतर न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याच्या पोलिस कोठडीत ३ दिवसांची वाढ करून ती आता १६ जानेवारीपर्यंत केली आहे. हिदायत पटेल यांच्यावर ६ जानेवारी उबेदखॉ राजीकखॉ पटेल याने खूनी हल्ला केला होता. यामध्ये ७ जानेवारीच्या पहाटे पटेल यांची प्राणज्योत मालवली. याप्रकरणी उबेदखॉ याच्यासह ६ जणांविरूध्द अकोट ग्रामीण पोलिसांनी खूनाचा गुन्हा दाखल केला. या प्रकरणातील मुख्य आरोपी उबेदखॉ याला अटक केल्यानंतर त्याला न्यायालयाने आधी १३ जानेवारी पर्यंत व आता १६ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. आरोपी हा दोन मोबाईल कंपन्यांचे काम करीत होता अशी माहिती पोलिसांच्या तपासादरम्यान समोर आली असून आरोपीकडून काही सिलबंद सिमकार्ड जप्त केल्याचे समजते. दरम्यान या प्रकरणातील एका आरोपीने अकोटच्या न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला असल्याची माहिती आहे.







हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK